म.ग्रं.सं., वाचनालय शाखा, ठाणे.
विषय : नाटक
दा.क्र.: २३७७२



# तुमचे अमुचे गाणे

रत्नाकर मतकरी

IRBK-0123772

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
सरस्वती मंदिर, सुभाष पथ,
स्टेशन रोड, जिल्हा परिषदे समोर
ठाणे-४०० ६०१
दुरध्वनी - २५४०६७८७

# तुमचे अमुचे गाणे

रत्नाकर मतकरी

IRBK-0123772
IRBK-0123772

मॅजेस्टिक प्रकाशन

DRM No. : 448/1985 of 19–4–85

तुमचे अमुचे गाणे
पहिली आवृत्ती :
डिसेंबर, १९८९

© सौ. प्रतिभा मतकरी,
राधा निवास, टिळक रोड,
दादर, मुंबई ४०० ०१४

प्रकाशक :

अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६, प्रसाद चेम्बर्स,
गिरगाव, मुंबई–४०० ००४

मुद्रक :
रवींद्र केशव कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ : रत्नाकर मतकरी

मूल्य : ३० रुपये

प्रयोगासाठी परवानगी घेणे अत्यावश्यक.

मीनल ( जोशी ) परांजपे,
आणि
डॉ. सुनील परांजपे—

या धडपड्या जोडीस

‘ तुमचे अमुचे गाणे ’ या नाटकाचा पहिला प्रयोग, शिवाजी मंदिर, दादर, येथे गुरुवार, दिनांक ३० मे, १९८५ रोजी सकाळी १०-३० वाजता सादर करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| दिग्दर्शन | : | दिलीप कोल्हटकर |
| संगीत | : | आनंद मोडक |
| ध्वनी | : | प्रदीप देशपांडे |
| नेपथ्य | : | प्रदीप रांगणेकर |
| प्रकाश–योजना | : | प्रफुल्ल संघाणी, राघू बंगेरा |
| संचालन | : | बबन आचरेकर, चंद्रकांत पुसाळकर |
| निर्मिती | : | रंगतरंग थिएटर्स, मुंबई |

| | | |
|---|---|---|
| **भूमिका** | : | |
| माधव | : | चंद्रकांत काळे |
| मीना | : | अनुराधा रेगे |
| आई | : | सौ. मालती पेंढारकर |
| निवेदक | : | दिलीप कोल्हटकर |
| इतर | : | मृदुला दंडगे, बापू कामेरकर, सोनल फडके, भारती शेवडे, स्मिता विद्वांस, सुधीर बलवल्ली, मुकुंद फणसळकर, अजित केळकर |

## रत्नाकर मतकरी यांची इतर प्रकाशित नाटके

| | |
|---|---|
| वाऱ्यावरचा मुशाफिर | १९५९ |
| वर्तुळाचे दुसरे टोक | १९६० |
| ब्रह्महत्या | १९६७ |
| बिऱ्हाड बाजलं | १९७२ |
| प्रेमकहाणी | १९७२ |
| आरण्यक | १९७४ |
| समोरच्या घरात | १९७७ |
| अजून यौवनात मी | १९७९ |
| लोककथा '७८ | १९७९ |
| अश्वमेध | १९८० |
| दुभंग | १९८१ |
| चि. सौ. कां. चंपा गोवेकर | १९८१ |
| माझं काय चुकलं ? | १९८२ |
| जोडीदार | १९८३ |
| निखारे | १९८३ |
| स्पर्श अमृताचा | १९८३ |
| कर्ता-करविता | १९८३ |
| खोल...खोल पाणी | १९८३ |
| अग्निदिव्य | १९८५ |
| वट वट सावित्री | १९८५ |
| सत्तांध | १९८६ |
| कार्टी प्रेमात पडली | १९८६ |
| विठो रखुमाय | १९८८ |

म. ग्रं. ... नाट्य, वाचनालय शाखा.
ग्रं. क्र. 23002 नों दि 26/9/...
वि. नाटक

## अंक पहिला

[ तिसरी घंटा वाजताच प्रेक्षागृहात काळोख होतो आणि नांदीचे सूर ऐकू येऊ लागतात.
क्षणभरानं पडदा दूर होतो आणि सूत्रधार व परिपार्श्वक हातात पूजा-साहित्य घेऊन नांदी म्हणत उभे असलेले दिसतात. ]

सूत्रधार : तुम्हां तो शंकर सुखकर हो । हिमधर स्थित विकट काननिं
तप करी प्रियकरी शुभकरी सुंदरी । तिजवरी भुलत निज
कैलासनगिं तो । शंकर सुखकर हो ॥ ध्रु ॥

[ परिपार्श्वक पूजा-साहित्य घेऊन जातात. सूत्रधारही जाऊ लागतो. निवेदक प्रेक्षकांमधून येतो. ]

निवेदक : अहो, अहो–थांबा– (वर चढून जातो. सूत्रधाराला) काय, हो, हे आत्ता काय केलंत ?

सूत्रधार : काय म्हणजे ? नांदी म्हटली.

निवेदक : नांदी म्हटली ? कशाला ?

सूत्रधार : कशाला म्हणजे ? नटराजाला वंदन करायला.

निवेदक : कशाला ?

सूत्रधार : कशाला कशाला काय ? तशी पद्धत आहे.

निवेदक : अस्सं. म्हणजे पद्धत म्हणून म्हटली. स्वतःला वाटलं, म्हणून नाही !

सूत्रधार : नाही कसं ? स्वतःला देखील वाटलं ना ! जरूर वाटलं.

निवेदक : काय वाटलं ?

सूत्रधार : मजा वाटली !

निवेदक : असेल. तुम्हांला गाणं म्हणताना ढीग मजा वाटली असेल ! पण आम्हांला

सूत्रधार : —तुम्हांला काय ?

निवेदक : आम्हांला त्यातला एक शब्दसुद्धा—शप्पत सांगतो—एक शब्दसुद्धा समजला नाही. (प्रेक्षकांना) समजला ?

सूत्रधार : कसा समजणार ? अहो, असल्या भारीपैकी गाण्यातले शब्द काय समजण्यासाठी असतात ? (एक भरभक्कम तान घेऊन) धनीसा पम पम पसा पसा—काय कळलं ?

निवेदक : काही कळलं नाही.

सूत्रधार : अहो, कसं कळणार ? त्यासाठी गाणं ऐकायची सवय हवी !

निवेदक : बरोबर आहे ! पण ती सवय व्हायला आम्हांला सवड कुठून मिळणार ? या धावपळीच्या आयुष्यात वाऱ्याच्या झुळुकीसारखं एखादं गाणं तेवढं आमच्या कानांत बसतं…तुमचं ते आऽऽऊऽचं गाणं आमच्या काय उपयोगाचं ? अहो, ते संगीत म्हणजे कसं, शांत बसून ऐकायला पाहिजे. आणि आजकाल…आजकाल लोक नुसते धावताहेत. समोरची ही सज्जन मंडळी आपल्या या नाटकाला आलीयत, तीच मुळी कसली कसली साहसं करून, ठाऊकेय् ?

सूत्रधार : साहसं ?

निवेदक : तर ? हे लोक सकाळी बसला रांगा लावून, नाही तर गाडीच्या धक्काबुक्कीत चेंगरून ऑफिसला गेलेत, तिथं समोरच्या कामाशी, बरोबरच्या सहकाऱ्यांशी आणि आतल्या बॉसशी अटीतटीचा सामना खेळून पुन्हा वाहनांच्या गर्दीत चिरडून घरी परतलेत, तिथं बायकोविरुद्ध बालेकिल्ले लढवून, मुलांना मुमंडी देऊन, येतायेता पिशवीत मिरच्या, कोथिंबीर आणि ओळखीत मेहुण्याच्या नोकरीसाठी शब्द टाकून ते कसेबसे तिसऱ्या घंटेपर्यंत इथं येऊन पोचलेत !

सूत्रधार : हुश्श !

निवेदक : आणि अशा या गांजलेल्या प्रेक्षकांना तुम्ही ते भारीपैकी वजनदार गाणं ऐकवून अधिकच हैराण करता !

सूत्रधार : अहो, पण आपली नाट्यसंगीताची परंपरा…

निवेदक : नाही, हो ! ते तसलं खानदानी, वैभवशाली परंपरेत बसणारं गंधर्वगीत आता आमचं राहिलं नाहीये. ते थोर लोक गेले, ते निवांत आयुष्य गेलं, तो सुखाचा काळ गेला, आणि त्याचबरोबर संगीताचा विलासही गेला. (लोकांना) काय, हो ? खरं, की नाही ?

विसरा तुमच्या रागरागिण्या
विसरा जुने तराणे

आता फिरली चाल, बदलले तुमचे अमुचे गाणे

कोरस : तुमचे अमुचे गाणे, तुमचे अमुचे गाणे......

निवेदक : जात्यावरती होती ओवी पूर्वी प्रातःकाळी
('अरे, संसार संसार,
जसा तवा चुल्यावर
आधी हाताला चटके
तेव्हा मिळते भाकर')
जात्यावरती होती ओवी पूर्वी प्रातःकाळी
नळानळावर आज चालते चक्क शिवीगाळी
पाणी जाते, म्हणून पळते पाणी तोंडाचे
कुठून यावे ओठांवरती स्वर गंधर्वांचे
निषेध–मोर्चे–संप घोषणा करू मुक्तकंठाने
आता फिरली चाल, बदलले तुमचे अमुचे गाणे

श्रीलंकेच्या व्यापारातच सूर आम्हांला मिळतो
('ये रेडिओ सिलोन का व्यापार विभाग है—'

तो : 'ये रात भीगी भीगी
ये मस्त फिजाएँ
उठा धीरे धीरे
वह चाँद प्यारा प्यारा'

ती : 'क्यूं आग सी लगाके
गुमसुम है चाँदनी
सोने भी नहीं देता
मौसम का ये इशारा')
श्रीलंकेच्या व्यापारातच सूर आम्हांला मिळतो
पकडून त्याचे बोट विजारी–बूट आम्ही चढवितो
लोकल देते ताल आम्हांला—
कशासाठी कोणासाठी
सारं काही पोटासाठी
लोकल देते ताल आम्हांला
भोंग्याच्या साथीने
आता फिरली चाल, बदलले तुमचे अमुचे गाणे

रात्री भवती असुर सुरांचा चालत असतो पिंगा
'जयजय रामकृष्ण हरी–जयजय रामकृष्ण हरी'
'हेऽऽ डिस्को बॉम्बे...बॉम्बे आय् लव्ह यू....आय् रिअली लव्ह यू'
रात्री भवती असुर सुरांचा चालत असतो पिंगा
चाळकमेटी वाद घालते भिडुन कुणाच्या अंगा
विसरून गेलो किलबिल, गुंजन झऱ्याविऱ्यांची गाणी
अमुच्यासाठी केवळ गाती छन्‌छन्‌ छन्‌नन्‌ नाणी
आज आम्हांला केवळ उरले जगण्यासाठी जगणे
आता फिरली चाल, बदलले तुमचे अमुचे गाणे

निवेदक : मला विचारशील, तर या वेळी इथं असं गाणं म्हणत उभं राहणंदेखील गैर आहे. वेळ घाईची आहे. सगळे बिचारे पोटार्थीजीव नोकरीवर जाण्याच्या गडबडीत आहेत...

[ सूत्रधाराला घेऊन घाईघाईनं जातो.
भोंगा होतो. एक बसस्टॉप. तिथं माणसं रांगेत उभी. डोळ्यांत प्राण आणून बसची वाट पाहताहेत. कुणी तेवढ्यात मासिक चाळतंय्. एका मुलीला दुसरी ओळखीची मुलगी भेटते. ]

दुसरी : ( पहिलीला ) काय, ग, आज उशीर झाला, वाटतं ?
पहिली : हो, ग ! रोज मेला उशीर ! आटपतच नाही लौकर !
दुसरी : चालतं तुमच्याकडे उशिरा गेलेलं ?
पहिली : अग, चालतंय् कुठलं ? बॉस फायर करतोच. आपण ऐकून घ्यायचं— मुकाट्यानं. कधी डोळ्याला रुमाल लावायचं नाटक करायचं. त्यालाही वाईट वाटतं. शिवाय रोज रोज तो तरी काय बोलणार ?
दुसरी : अय्या ! बस आली !

सगळे : आली, आली ! बस आली, बस !
इकडे तिकडे, मागे पुढे, डावी किंवा उजवीकडे,
जिकडे मिळेल जागा, तिकडे चटकन जाऊन बस.
बस आली, बस.

एक गृहस्थ : किती वेळ वाट पाहून

गेलो होतो कंटाळून
घड्याळात पाहून पाहून
डोळे गेले होते शिणून
आता एकदा बसमधे
घेतलं, म्हणजे बस !
बस आली–बस !

[ सगळे रांग मोडून घाईघाईनं पुढं घुसतात. कंडक्टरचं 'जगा नहीं, जगा नहीं' ऐकू येतं. लोकांची गडबड. क्षणभरानं काही लोक निराश होऊन परत फिरतात.
निराशेनं, सावकाश म्हणतात : ]

बस गेली–बस !

एक मुलगी : ठण्ण करून म्हणतो मेला
दो या तीन, बस !
दुसरी : शीऽऽ
कोरस : वाटलं होतं, थोडे तरी
घेऊन गेल्यावाचून यात्री
नाही राहणार–येईल वर
तेवढा तरी आपला नंबर
पण कसचं काय, कसचं काय,
सगळंच ओम् फस !
बस गेली, बस !

[ पुन्हा रांग लावण्याचा अयशस्वी प्रयत्न करतात.
निवेदक मधेच येऊन रांगेतल्या माधव कानविंदेच्या पाठीवर थाप मारतो. ]

सगळे : ( आरडाओरडा करून ) ए, बीचमें घुस गया ! जन्टलमन होके भी ऐसा....हम लोग कभीसे खडे हैं....वगैरे वगैरे.
निवेदक : ( लोकांना ) हे बघा, हमकू जानेका नहीं है बसमें. तुम जावो ना. कायकू खाली फुकट गडबड करता है ? ( माधवला ) बघा ना...

माधव : तुम्ही कोण ? मी ओळखलं नाही.

निवेदक : द्या टाळी !

माधव : ( नकळत टाळी देऊन ) आं–? टाळी कशाबद्दल ? मी ओळखलं नाही, म्हटलं ना ?

निवेदक : म्हणूनच टाळी ! तुमच्या प्रामाणिकपणाला दाद दिली ! तुमच्यासारखं कुणी स्वच्छ सांगत नाही...ओळखलं नाही, म्हणून ! मी बाकी तुम्हांला ओळखतो हं. तुम्ही माधव कानविंदे, पदवीधर, अकाऊंटंट जनरलमधे कारकून !

माधव : तुम्हांला कसं माहीत ?

निवेदक : मनात साकार होऊ शकतील, इतपत सोपी स्वप्नं, सोईस्कर आकांक्षा. थोडक्यात, तुम्ही आजच्या मध्यमवर्गीय तरुणांचे प्रतिनिधी ! काय ?

माधव : कसला प्रतिनिधी आणि कसलं काय ? आपण एक झुरळ आहोत, असं वाटतं !

निवेदक : काहीतरीच काय ? चला, चहा पिऊ या !

माधव : नको. आधीच उशीर झालाय्.

निवेदक : होऊ दे. एक दिवस कराच तुम्ही उशीर. काय, हो, एखाद दिवशी सुद्धा बंड करावंसं नाही का, हो, वाटत तुम्हांला ?

माधव : वाटतं की ! रोज वाटतं, बंड करावंसं. पण त्या बंडाचा परिणाम काय होईल, माहीतेय् ?

निवेदक : काय ?

माधव : मस्टरवर लेटमार्क !

निवेदक : मिळू दे लेट मार्क !

माधव : तीन लेट मार्क्स म्हणजे एक कॅज्युअल !

निवेदक : वा—मग तर काय ? आज घेऊनच टाका कॅज्युअल—छानपैकी !

माधव : आणि करा काय ?

निवेदक : बंड !

माधव : अहो, आम्ही कसलं बंड करणार ? आमची रास मेष आणि जन्मस्थानी शनी ! सांगितलं ना तुम्हांला ? आम्ही झुरळ आहोत, झुरळ !

निवेदक : झुरळालाही पंख असतात.

माधव : झुरळालाही असती पंख
मुंगीलाही असतो डंख
इतकी सुद्धा ताकद नाही आमच्या मनगटात

आम्ही छोटीछोटी माणसं फिरतो या वर्तुळात
आमच्या छोट्या वर्तुळात
आम्ही फिरतो वर्तुळात

भव्य स्वप्नं, दिव्य आशा
शोभत नाही असली भाषा
हिशेब दरिद्री पै–पैशाचे
आम्ही केवळ मांडायाचे
मनातले मांडे केवळ आमच्या
मनामध्ये उरतात
आम्ही छोटी छोटी माणसं फिरतो या वर्तुळात

तांदूळ अथवा तेलासाठी
रांगा लावून करू हकाटी
साखर कार्डावरती मिळणं
एवढंच आमचं गोऽड स्वप्न
घाम शिंपुनी माथ्यावरला
होतो केवळ रुमाल ओला
ओटे होती निळी जांभळी शाईच्या रंगात
आम्ही छोटी छोटी माणसं फिरतो या वर्तुळात

कुणीही येतो चिरडून जातो
आम्ही फक्त बघत राहतो
प्रतिकाराचं सोडा, आम्ही सोसत सोसत संपून जातो
आमचं जगणं काय ?
नुसतं ‘ पानी कम् ’ चाय !
आमचे आम्ही भले कुणाच्या अध्यात ना मध्यात
आम्ही छोटी छोटी माणसं फिरतो या वर्तुळात
आमच्या छोट्या वर्तुळात
आम्ही फिरतो वर्तुळात

निवेदक : सामान्य माणसंही लग्न करतातच !
माधव : मला वाटलंच ! आपणहून ओळख दाखवलीत, तेव्हाच ओळखलं.

निवेदक : काय ?

माधव : तुम्ही स्थळ आणलं असणार.

निवेदक : (हसून) स्थळबिळ काही नाही. पण काय, हो, सहज विचारतो, यंदा कर्तव्य आहे का ?

माधव : कर्तव्य आहे, हो! पण मुलगी मिळायला नको? आम्ही कारकून. आम्हांला कोण चांगली मुलगी देतंय्? आणि अगदीच एखादं कोळशाचं पोतं, नाहीतर डाल्डाचा डबा पत्करायचा, त्यापेक्षा—

निवेदक : पण म्हणजे बऱ्यापैकी मुलगी मिळाली, तर तुम्ही लग्नाला तयार आहात, खरं, की नाही ?

माधव : नुसती बऱ्यापैकी नाही. शिवाय नोकरी करणारी हवी. माझा नाही, पण आमच्या आईचा आग्रह आहे!

निवेदक : आईचा आग्रह ? नोकरी करणाऱ्या सुनेसाठी ?

माधव : हो! मुलीला नोकरी हवीच !

[माधवची आई करपे मास्तरांशी बोलतेय्. (निवेदकाचाच आता करपे मास्तर झालाय्.) आई एकदा बोलायला लागली, की तिला थांबवणं कठीण !]

आई : तुम्हीच सांगा आता, करपेमास्तर, आजच्या दिवसांत सून आणायची, तर तिचा संसाराला काही उपयोग हवा, का नको ?

करपे : हवा तर! आणि तुम्हांलाही मदत हवी. तुमचं वय होत चाललं!

आई : मला कपाळाची मदत! अहो, तशी घरकामाला मदत होण्याची आशा नाही राहिली आता सुनांकडून! ते दिवस गेले! सुनेनं खपायचं नि सासूनं बसून खायचं—ते विसरायचं आता. आम्ही खूप काढलं. सासूच्या धाकात एकेक दिवस नुसता जीव मुठीत धरून काढला. पहाटेपासनं काम जे सुरू, ते रात्री संपेस्तंवर कमरेचा काटा ढिला व्हायचा. आताच्या मुली काय करणार असलं काम ? सतरा वेळा पावडर लावा नि केस विंचरा याच्यात त्यांचा अर्धा दिवस जाणार! (तेवढ्यात तिथे आलेल्या लताला एक धपका घालून) आमचं हे सोंग बघा. लहान नाही आता ही. पण आहे हिची आईला मदत ? हिची शाळा हिला झेपताना कठीण! त्यातनं कुठं वेळ मिळाला, तर टिवल्याबावल्या करील, पण इकडची काडी तिकडे नाही करणार! उद्या सासरी गेल्यावर तरी काय, एकदम थोडीच कामाची सवय होणारेय्? मग सासू आमचाच उद्धार

करणार, का नाही ?

लता : तुम्ही काही लक्ष देऊ नका, हो, करपेमास्तर. आईला म्हंजे मी किती केलं, तरी थोडंच वाटतं. मी चहा करते, केरवारा करते, कधी कधी पोळ्यासुद्धा लाटते—घाई असली, तर!

माधव : अहाहा! दिवे लागले कामाच्या नावानं. पोळ्या लाटते, त्यात इतके आकार! कधी वाघाचा जबडा, कधी सशाचे कान!

लता : बरं बरं! समजेल तुझी बायको स्वैपाक करील, तेव्हा! मास्तर, आमच्या दादाच्या लग्नाचं बघा, हो, कुठं जमतं का, ते!

माधव : मोठी आजीबाईच लागून गेली! म्हणे, बघा, हो, कुठं जमतं का, ते! दातपडकी कुठली!

लता : आणि बरं का, करपेमास्तर, अशी सुंदर बायको शोधून आणा...नकटी, काळुंद्री, हडकुळी—

आई : पुरे, ग! तुझं काय आहे मोठ्या माणसांच्यांत ? जा बरं बाहेर.

लता : बाहेर गेले, की म्हणतेस टिवल्याबावल्या.

करपे : तुझंच लग्न करून टाकू या, लता. काय, आई, हवाय् का जावई ?

लता : मी कध्धीच लग्न करणार नाही.

करपे : असं तुझ्या वयात सगळीच म्हणतात.

आई : तेव्हा मी काय म्हणत होते, मास्तर, सुनेची घरात मदत व्हायचे दिवस राहिले नाहीत—संसाराला मदत केली, तरी पुष्कळ! म्हणून म्हणते, मुलगी नोकरीचीच हवी!

करपे : कमाल आहे तुमची, माधवच्या आई! तुमच्या वयाच्या बायका नोकरी करणाऱ्या मुलींना नाकं मुरडतात! आणि तुम्ही नोकरी करणारीच सून हवी, म्हणता ? भलत्याच फॉरवर्ड आहात तुम्ही!

आई : फॉ—काय म्हणालात ?

करपे : फॉरवर्ड– म्हणजे पुढारलेल्या.

आई : डोंबलाची पुढारलेली! अहो, नाइलाज झाला, की माणसाला बदलावं लागतं. बाहेर ही अशी महागाई पेटलीय्. नारळ झालाय् पाच रुपये. अशात एकट्याच्या नोकरीनं भागतंय् ? चार पैसे हातात आले, तरच संसारात सुख! नाही तर काय, हो! दरिद्र्याच्या संसारासारखी शिक्षा नाही दुसरी—आणि पुष्कळ काढलंय् आम्ही दारिद्र्य! याचे वडील होते बोट कंपनीत. मधेच कंपनी बुडाली आणि आम्ही उघड्यावर पडलो. मग चारजणांचे पाय धरून यांनी मिळतील त्या नोकऱ्या केल्या, पण संसाराला पुरेसं कधीच मिळालं नाही. त्या वेळेस हज्जारदा मनात यायचं—आपण चार

माधव : असं ?

शिरधनकर : हो. पगार चांगला आहे ! आणि विशेष, म्हणजे प्रॉस्पेक्ट्स फार चांगले आहेत. म्हणजे बघा, सध्या इतका चांगला पगार दुसरीकडं कुठं मिळायचा नाही. त्यातून माझी सर्व्हिस आज जवळजवळ पंचवीस वर्षं झालीय्. म्हंजे बघा, आमच्या डिपार्टमेंटला मीच सीनियरमोस्ट आहे. आमच्या डिपार्टमेंटमधे आम्ही एकूण अडतीस लोक आहोत. पण त्या सर्वांवर–

करपे : ( त्यांची बडबड थांबवण्यासाठी ) यांना जरा घाई आहे.

शिरधनकर : हे कुठं सर्व्हिसला आहेत, म्हणालात ? एजीमधे ना म्हणजे बँकेइतके प्रॉस्पेक्ट्स नाहीत. पण चांगलं आहे. गव्हन्मेंट जॉब आहे, म्हणजे धास्ती नाही कसली ! सिक्युरिटी आहे ! आणि काय, हो, पुढं परीक्षा वगैरे दिल्या, की प्रमोशन्स मिळत जातातच. जातील कुठं ? पण एक आहे गव्हन्मेंटमधे–काम एकसारखं करावं लागतं. हो, म्हंजे त्यातून सुटकाच नाही. आपण खूप म्हणू—

आई : मुलगी कुठं आहे ?

शिरधनकर : बोलावतो. चहापाण्याच्या गडबडीत असेल. खाण्याचे सगळे जिन्नस तिनंच तयार केलेत. स्वैपाक करण्याची फार आवड. झालंच, तर भरतकाम...कशिदा...काही विचारू नका. ही एवढी असल्यापासून करतेय् कशिदा. ड्रॉइंगच्या परीक्षा पण दिल्यायत. अर्थात त्याचा संसाराला तसा उपयोग–म्हंजे म्हटलं तर, आहे–पण...

[ शिरधनकर मुलीचं सांकेतिक गुणवर्णन ऐकवू लागतात. माधव आपल्याच विचारात ]

माधव : हे दाखवणं हे बघणं–या असल्या घोळाचा
साला, वैताग येतो भयंकर या सगळ्या सगळ्याचा

तो कशिदा, ते विणकाम, ते भरणं नि काचकाम
अहो, तुम्हीच सांगा, यात काही आता उरला आहे का राम ?
ती सगळे पदार्थ करते–ती गाणंही गोडगोड म्हणते—
(' जीवनात ही घडी अशीच राहू दे,
प्रीतीच्या फुलावरी लालल्लाल देऽऽ ')
ती सगळे पदार्थ करते–ती गाणंही गोडगोड म्हणते—

जशी बाजारातली म्हैस दूध हंडा भरून देते
हे सगळं खोटं खोटं–हे नाटक बघायचा
साला, वैताग येतो भयंकर या सगळ्या सगळ्याचा

पण वैतागून तरी करणार काय !
यावर उपाय नाय !
अहो, आपलं आपण जुळवावं, ही लाईन जमत नाय
देवा, होऽऽ
अहो, आपलं आपण जुळवावं, ही लाईन जमत नाय
तेव्हा गिळून सगळी चीड हा प्रसंग निभवायचा
साला, वैताग येतो भयंकर या सगळ्या सगळ्याचा

[ एव्हाना शिरधनकरांनी विविधरीत्या मुलीचे गुणवर्णन पार पाडलेले. ]

लता : आई, मुलीला बोलवायला सांग ना.

आई : तू गप, ग ! घरी काय सांगितलं होतंस ? गुपचूप बसेन, म्हणून ना ! मग आता कटकट करू नकोस–अहो, मुलीला बोलवता ना ?

शिरधनकर : हो ! ( एकदा जाऊन सगळं ठीक असल्याची खात्री करून घेत ) येतेच आहे....अग मीनाऽऽ

[ माधव उत्सुकतेनं आतल्या दाराकडे पाहू लागतो. एवढ्यात आतून डझनभर डोळे आपल्यावर खिळल्याची त्याला जाणीव होते. तो अस्वस्थ होऊन खाली पाहू लागतो. याच वेळी मीना हातांत चहाचा ट्रे घेऊन प्रवेशते. अर्थात खाली पाहत. ]

आई : ये. बस.

[ ती बसते. एकंदरीत प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची मुलगी. तिला पाहताच माधवचा चेहरा उजळतो. ]

शिरधनकर : ( बडबड चालूच— ) आता आमच्या बायकोच्या भाचीचे गुण आम्हीच काय सांगायचे ? पण खरंच सांगतो, आजकाल अशा मुली मिळत नाहीत. जरा कुठं चार बुकं शिकल्या, की त्यांना आकाश ठेंगणं होऊन

जातं. लहान नाही, मोठं नाही, वाटेल तशी दुरुत्तरं करतात. पण आमची मीना कधी वर उलटून बोलायची नाही. दहावीपर्यंत शिकलीय्. आता नोकरी करते. तुमची नोकरीची अट सांगितलीय् आम्हांला करपे-मास्तरांनी आणि बरोबरच आहे ते. नोकरी हवीच, हो, मुलीला— हल्लीच्या दिवसांत त्याशिवाय काय भागतंय्? मग नवऱ्याची नोकरी किती का चांगली असेना— तुम्ही गप्प का? विचारा की काही.

माधव : कुठं असता नोकरीला?

मीना : यांच्याच बँकेत असते.

शिरधनकर : साहेब फार खूश आहेत हिच्या कामावर. नेहमी म्हणत असतात, की काम असावं, तर हिच्यासारखं! हिचं असंच आहे. एकदा कुठलंही काम करायला घेतलं, रे, घेतलं, की...

[ही स्तुती असह्य होऊन मीना शिरधनकरांकडे एक दृष्टिक्षेप टाकते. हे माधवच्या लक्षात येतं.]

लता : नोकरी आहे, मग या कशिदा कधी करतात?

शिरधनकर : कशिदा—?

लता : हो. हे भरतकाम वगैरे-

शिरधनकर : हां, ते होय? ते पूर्वी केलेल आहे. आताही करते कधी कधी, शनिवार, रविवारी वगैरे. म्हणजे सकाळची जेवणं झाल्यावर जी बसते कशिदा करायला, ती रात्रीपर्यंत पुरं करून टाकते. त्यातून आता हात बसलाय्— जरा सुद्धा चूक होत नाही—

लता : (मीनाला) तुमचा फोटो दाखवला होता मास्तरांनी. पण तुम्ही खऱ्या अधिक चांगल्या दिसता...हो, की नाही, रे, दादा? सांग ना!

माधव : हो.

लता : तुम्ही बिस्किटं घरी करता का, हो?

मीना : नाही का ?

लता : मघा हे म्हणत होते, की खायचे सगळे पदार्थ तुम्ही केलेत...मला वाटलं, बिस्किटं पण..

आई : लता!

शिरधनकर : (मोठ्यानं आवाज करून हसतात) चुणचुणीत आहे पोर! अगदी शब्दांत पकडलं, बघा! आहे— डोकं आहे! कानविंदेसाहेब, तुम्ही काहीच विचारलं नाहीत मुलीला. विचारा— उगाच संकोच नका करू...आमची

मीना म्हंजे बघा, फाडफाड उत्तरं देईल. मागं नाही राहणार. तुम्ही विचारून पाहा तर खरं!

माधव : असू दे. विचारायचं काय-? त्या एवढया नोकरी करणाऱ्या-पन्नास इंटरव्ह्यू दिले असतील.

[ मीनाला हायसं वाटतं. ]

शिरधनकर : अहो, पण हा इंटरव्ह्यू सगळ्यांत महत्त्वाचा. बरं, मग जाऊ दे का मुलीला आत ?

आई : हो.

[ मीना आईच्या पाया पडते व जाते. ]

माधव : आम्हीही निघतो आता.

शिरधनकर : बरं, मग पुढचं सगळं—

माधव : उद्या पाठवा करपेमास्तरांना. त्यांच्याकडे कळवतो.

[ मंडळी निघतात.
भोंगा वाजतो. बस-स्टॉप. स्टॉपवर ऑफिसवाल्या मंडळींची नेहमीची गर्दी. ]

कोरस : बस येत्येय्, बस येत्येय्, बस येत्येय्, बस
रोज रोज रोज ऽऽ बस येते, बस
रोज सकाळी उठल्यापासून बस बस बस
बस येत्येय्, बस

सकाळ होते, रात्र होते, जिणे आमचे बदलत नसते
आम्ही एकेक यंत्र नुसते चालते फिरते काम करते
माना लववून, कमरा मोडून भरतो आम्ही दिवस
बस येत्येय्, बस ऽऽ
रोज रोज रोज ऽऽ
आली, आली, आली, आली, बस आली, बस

[ पण या गर्दीत उभा असलेला माधव मात्र आज त्यांच्यापासून वेगळा झालेला. ]

माधव : मला काही कळत नाही, काही कळत नाही
मला मीच, मीच मला, ओळखत नाही

[ रंगमंचाच्या दुसऱ्या कोपऱ्यात विचारमग्न मीना. ]

मीना : मला काही कळत नाही, काही कळत नाही
मला मीच, मीच मला, ओळखत नाही
ते होते कोण, कुठले, जणू स्वप्नी येऊन गेले
लाजऱ्या अबोल माझ्या प्रीतीला पंख आले
मला असे वेड कसे लागले, कळत नाही
मला मीच, मीच मला, ओळखत नाही :

माधव : वाटे स्वतःच्याच स्वतः
चढून खांद्यावरती आता
फोडू चला दहीहंडी
मारू ऑफिसाला दांडी
सभा चौपटीवर घेऊन
टाकू एकदा जाहीर करून
अहो, आमच्या हृदयात
कुणी आले अकस्मात... ....
आमचे अवघे जगणे-मरणे
होते बेकार, दीनवाणे
ते ऽ झाले एकदम न्यारे
भव्य, सुंदर, दिव्य वगैरे
अहो, ऐसा झाला प्रकार, कैसा कळत नाही
मला मीच, मीच मला ओळखत नाही...
मला काही कळत नाही... (जातो.)

[ बसच्या रांगेतले सगळे लोक आता माधवच्या ऑफिसमध्ये येऊन बसलेले. ]

सगळे : बॉस आला, बॉस
पुरेत गप्पाटप्पा आता

पानतमाखू पोकळ बाता
थोडेसे तरि काम करावे
निदान तैसे ढोंग करावे
विड्याबिड्या त्या दडवून ठेवा
मासिक फाइलमध्ये लपवा
ना तरि होईल रिपोर्ट वरती

बॉस : ( कवाईत घेतल्याप्रमाणे )
वन टू –
आइज डाउन
लिफ्ट युअर पेन–
क्विक मार्च–
वन् टू....वन् टू...
काम चालू, रस्ता बंद
वन टू...वन टू.... ( मार्चिंग करीत जातो )

क्र. 23502
दि.

सगळे : बॉस गेला, बॉस
आता श्वास सोडा, श्वास
खुशाल करा पाय मोकळे
काम पुष्कळच करून झाले.
गप्पा हाणा वेड्यावाकड्या
चहा सांगा–काढा विड्या
सारे होऊ द्या बिनधास
बॉस गेला, बॉस

एकजण : काय, कानविंदे, जमलं, म्हणे, तुमचं ?

एक बाई : अग्गो बाई ! लग्न का जमलं कानविंद्यांचं ? पत्ता लागू दिला नाही.
बरेच आहात की, हो, आतल्या गाठीचे !

…जण : अहो, गाठ सुटायचीय् आता ! ( सगळे हसतात. )

…व : नुसती पसंती कळवलीय्. बाकी सगळी बोलणी व्हायचीत अजून.

: मग ? फिरायला जाता, की नाही ?

तिसरा : कानविंदे, फॅमिली रूम्सची माहिती हवी असेल, तर सेपरेट भेटा.

माधव : नाही, हो. फिरणंबिरणं काही नाही. एकदा मुलगी पाहिली, त्यावर अजून भेटसुद्धा नाही.

[ शिपाई भूत दिसल्यासारखा पळत येतो. ]

शिपाई : कानविंद्यांकडे मुलगी आलीय्.

[ माधव चकित. ]

सगळे : बघा ! आणि थापा मारीत होते ! कबूल करायला काय होतं—वगैरे वगैरे.

[ माधव मंडळींतून बाहेर येऊन मीनाला भेटतो. ]

माधव : तुम्ही—इथं कशा ?

मीना : थोडं काम होतं.

माधव : चला, आपण कॅन्टीनमधे जाऊ.

[ दोघे कॅन्टीनमधे येतात. माधव दोघांसाठी चहा घेऊन येतो. ]

माधव : हं, आता बोला.

मीना : ( काही क्षणांनी ) तुमची पसंती कळली.

माधव : मग ? ( ती गप्पच. ) मी पसंत नाही का तुम्हांला ?

मीना : अय्या, काहीतरीच काय ? ( थांबून ) चहा चांगला आहे, नाही ?

माधव : बराय्. पण मला साखर थोडी अधिक लागते. ( चमच्यानं घेतो. )

मीना : म्हणजे माझं बरोबर !

माधव : काय बरोबर ?

मीना : मी त्या दिवशी अधिक साखर टाकली होती चहात.

माधव : म्हणून तर मी तुला—तुम्हांला पसंत केलं.

मीना : चहा आवडला, म्हणून ? म्हणजे माझ्यातलं काही नाही आवडलं ?

माधव : आवडलं ना. तुझे—आपलं, तुमचे डोळे आवडले.

मीना : बस्स ?

माधव : आणखी.... नंतर सांगेन कधीतरी. ( ती लाजते. ) बरं, तुम्हांला मी आवडलो, की नाही ?

मीना : अं ऽ हं !

माधव : म्हणजे ? मी आवडलो नाही ?

मीना : नंतर सांगेन कधीतरी ! (दोघंही हसतात. मग एकदम गंभीर होऊन) म्हणजे तशी संधी मिळाली–तर !

माधव : म्हणजे ?

मीना : म्हणजे आपलं लग्न होऊ शकलं, तर ! तेच सांगायला आले होते मी. पहिलं, माझ्या मावशीचे यजमान–भाऊ शिरधनकर–ते एकसारखे वडबड करतात. थापा मारतात. प्रत्येक गोष्ट शंभरपट वाढवून सांगतात. कशिदा काय, भरतकाम काय, सगळं खोटं ! तुम्ही थोडेच भरतकाम बघायला आला होता ? पण यांची बुद्धीच तेवढी ! उगाच शेजाऱ्या-पाजाऱ्याकडून गोळा करून आणल्या काहीतरी चिजा.

माधव : कमाल आहे !

मीना : तसं त्यांचंही बरोबर आहे. माझ्या लग्नाचं पाहणारं त्यांच्याशिवाय दुसरं कुणी नाही. गावी आई–वडील आहेत. पण घरचं उत्पन्न नाही. मावशीचीच मदत !

माधव : ते सांगत होते, शेतीवाडी, जमीन जुमला आहे, म्हणून.

मीना : सगळं खोटं. तुम्हांला खूश करण्यासाठी. त्यांना झालीय् मला उजवून टाकायची घाई ! हो, नाहीतर किती दिवस राहायचं मी त्यांच्याकडे ? आजकाल फुकट कोण पोसणारेय् परक्याच्या पोरीला ?

माधव : फुकट म्हणजे ? तुमचा पगार...

मीना : धक्का बसेल तुम्हाला. पण मी नोकरी करीत नाही

माधव : काय म्हणालात ?

मीना : भाऊनी तुम्हांला खोटं सांगितलं. तुम्हांला नोकरी करणारी बायको हवीय्, तुमची तशी अटच आहे. असं कॅपेमास्तर म्हणाले, म्हणून. मी नोकरी करीत नाही. शोधत्येय् पण फक्त दहावी पास मुलीला लगेच कशी नोकरी मिळणार ? आमच्या परिस्थितीत अधिक शिक्षणंही कठीण होतं.

माधव : हे इथं येऊन का सांगितलंत ? लग्न मोडण्यासाठी ?

मीना : नाही. लग्न मोडाव, असं कसं वाटेल मला ? पण फसवून लग्न करायचं-तेसुद्धा बरोबर वाटत नाही. मला मला तुम्हांला फसवायचं नव्हतं. तुम्ही–तुम्हाला कुठलीही–माझ्यापेक्षा चांगली–शिवाय नोकरी करणारी मुलगी मिळेल. तुम्ही सुखी व्हाल. एक मात्र करा. मी इथं येऊन तुम्हांला हे सांगितलं, हे, काय वाटेल ते झालं, तरी भाऊना कळू देऊ नका. हे लग्न मी मोडलं, असं कळलं, तर ते मला घरातच ठेवणार नाहीत.

(थांबून) नाही ना सांगणार ?

माधव : नाही.

मीना : थँक्यू. मी जाते. तुमच्यासारख्या वड्या ऑफिसरचा वेळ घेणं...

माधव : काय म्हणालीस ? बडा ऑफिसर...हे कुणी सांगितलं ? शिरधनकरांनी ?

मीना : हो.

माधव : आणखी काय सांगितलं ?

मीना : आणखी....आणखी पुढल्या वर्षी तुम्ही अमेरिकेला जाणार....

माधव : आणखी-?

मीना : आणखी तुमचा फ्लॅट आहे- स्वतःचा...

माधव : वा- स्वप्नातसुद्धा मला इतकं चांगलं सुचत नाही.

मीना : म्हणजे- हे खोटं आहे ?

माधव : 'एक संपूर्ण स्वतंत्र सामाजिक नाटक!' मी साधा कारकून आहे. एकट्याच्या पगारात भागायचं नाही, म्हणून तर मला नोकरी करणारी बायको हवी आहे. अमेरिकेला जाणं मला या जन्मी शक्य नाही! आणि गिरगावात माझी जागा आहे, ती भाड्याची. चाळीतल्या दोन खोल्यांची.

मीना : आता कळलं ना, भाऊ कसे प्रत्येक गोष्ट वाढवून सांगतात ?

माधव : (विषण्णपणे) पण म्हणजे....म्हणजे तू माझ्या हुद्द्यासाठी माझ्याशी लग्न करणार होतीस-!

मीना : जसे तुम्हीही माझ्याशी माझ्या नोकरीकरता लग्न करणार होता!

माधव : (खट्टू होऊन)

मज समजायाला हे आधीच हवे होते
हे कधीच माझे नव्हते- हे कधीच माझे नव्हते.

ज्या मोहक रंगतरंगी
पडतसे जिवाला भूल
तो केवळ इंद्रधनूचा
आकाशी अस्थिर पूल
का स्वप्न असे मायावी-या नजरेलाही पडते
हे कधीच माझे नव्हते-हे कधीच माझे नव्हते....

मीना : मज समजायाला आधीच हवे होते

हे कधीच माझे नव्हते–हे कधीच माझे नव्हते
जाहला मनाला भास,
की आला स्वर्गच हाती
परि निराश आशा बोले
ती केवळ माती माती
मज अभागिनीच्या भाळी–का प्रीती लिहिली असते
हे कधीच माझे नव्हते–हे कधीच माझे नव्हते...

[ ती निघून जाते. तो तसाच उभा. एखाद्या प्रचंड धक्क्यातून अजूनही न सावरल्यासारखा. निवेदक येतो. ]

निवेदक : काय, कानविंदे, लग्नाचं कुठवर आलं ?

माधव : ( एकदम भडकून ) काय, हो, तुम्हांला बोलायला दुसरा विषयच नाही की काय ! भेटलो, रे, भेटलो, की लग्नाविषयी विचारता, ते !

निवेदक : रागावू नका. मला वाटलं, तुम्हांला उलट गुदगुल्या होत असतील, लग्नाचं विचारलं, की.

माधव : गुदगुल्या ना–? होतात तर ! अस्वल नाही का गुदगुल्या करून ठार मारत ?— त्यातलंच लग्न ! आता पुन्हा कधी विचारू नका. एकदाच सांगतो—मला लग्न कर्तव्य नाही ! यंदा नाही– कधीच नाही. या जन्मात नाही !

निवेदक : ( हसून ) काय नाही करायचं, ते लगेच ठरवा ! काय करायचं, ते कुठं येतंय् ठरवता ?

माधव : शटाप ! मला आणखी भडकवू नका हं...

[ निवेदक हसत हसत निघून जातो. ]

आई : अरे, आज अशी चिडाचीड का करतोयस एकसारखी ? बस. चहा होतच आलाय्.

माधव : मला नको चहा. माझा आत्ताच झालाय्.

आई : मग खा काहीतरी.

माधव : नको म्हटलं ना ? मला भूक नाही.

लता : त्या दिवसापासनं, किनई, आई, एका माणसाची तहानभूक हरवलीये.

माधव : ( ओरडून ) तू चूप बसतेस, की नाही ?

आई : अरे, बोलू दे तिला. तिच्याएवढया मुलींना, की नाही, हुरूप असतो नव्या वहिनीचा.

लता : हो– पण मला वहिनी येणार, हे कुठं ठाऊकेय् दादाला ? त्याला वाटतं, की आपल्यालाच बायको येणारेय्.

आई : आता वाटतंय् तुला कौतुक ! नंतर वहिनी चांगलं राबवील, तेव्हा समजेल. अग, नोकरीवाली मुलगी ती ! शंभर वेळा वाकवेल. वन्सं–गाडी चुकतेय्, जरा डबा भरून द्या ! वन्सं, उशीर झाला, तेवढं पाणी द्या ! वन्सं, दमून आलेय्, कपभर चहा द्या ! वन्सं—

माधव : ( ओरडून ) तुम्ही दोघींनी हे चालवलंय् काय ? अजून कशाचा कशाला नाही पत्ता, आणि लांबलांब गोष्टी करताय् !

आई : ( किंचित आश्चर्यानं ) पत्ता नाही, म्हंजे ? आता आणिक काय बाकी राहिलंय् ?

माधव : अग, पण अजून ठरलंच आहे कुठं काय ?

लता : वा वा, रे– आम्ही नाही ऐकून घेणार. आम्हांला हीच वहिनी पाहिजे. आणि, किनई, दादा, तिला देखील तूच आवडलायस हं...

माधव : ( असह्य होऊन ) लता....( तिच्या पाठीत धपाटा घालतो. )

आई : अरे, तिला कशाला मारतोस ?

माधव : मग ? लहान का ती आता वाटेल तसं बडबडायला ? आणि तू आणखी तिची बाजू...

[ करपे मास्तर येतात. ]

करपे : काय झालं, माधव ?

माधव : कशाचं काय झालं ?

करपे : तुझ्या लग्नाचं, आणि कशाचं ?

आई : अहो, त्यावरनंच तर सगळी वादावादी ! त्या दिवशी म्हणाला, मुलगी आवडली. लता चाळभर सांगून बसली. मी आज भटजींकडून मुहूर्तसुद्धा विचारून आले. आणि आता हा म्हणतो, अजून कुठं काय ठरलंय् ?

करपे : ठीक आहे. सावकाश ठरवू दे त्याला. आपली घाई कशाला ?

आई : अहो, घाई न करून कसं चालेल ? हॉल तर सहा सहा महिने आधी सांगून ठेवावा लागतो.

करपे : त्याला समजत का नाही, आई ? पण लग्न म्हणजे जन्माचा प्रश्न ! सगळ्या बाजूंनी नीट विचार करायला हवा. तू सावकाशीनं ठरवून सांग, माधव.

पण फार वेळ लावू नकोस. नाही म्हणजे—मुलीकडचे लोकसुद्धा थोडे उतावीळच झालेले असतात. त्यांना तरी किती दिवस अडकवून ठेवायचं ?

आई : अहो, पण याचं सगळं ठरतच आलं होतं !

करपे : काही का असेना ? पण आता एकदाचा निर्णय घ्यायला हवा !

माधव : ( पुढे येऊन )

निर्णय ? निर्णय घ्यायला हवा ?
आता निर्णय घ्यायलाच हवा !

उलटा किंवा सुलटा, वेगळा किंवा जुळता
खोटा, नाहीतर खरोखर; चुकीचा, नाहीतर बरोबर
उजवा अथवा डावा, पण निर्णय घ्यायला हवा !
आता निर्णय घ्यायलाच हवा !

पहिल्याप्रथमच आयुष्यात
अवघ्या एक वा दोन दिवसांत
राहतो उभा, की होतोय् आडवा—
निर्णय घ्यायला हवा !
आता निर्णय घ्यायलाच हवा !

त्यातून आम्ही हॅम्लेट साक्षात्
असं होईल, तसं होईल, असल्या घोरात
विचार करतो सतराशे सात
जगावं किंवा मरावं, की अर्धमेलंच राहावं
यातच आम्ही झुरावं आणि झुरता झुरता म्हणावं,
देवच आता सांगेल कुठला
निर्णय घ्यायला हवा !
आता निर्णय घ्यायलाच हवा !

[ मीना मुकाट बसलेली. शिरधनकरांची बडबड चालूच. मीना हूं की चूं न करता सगळं ऐकून घेतेय्. ]

शिरधनकर : (येरझारा घालीत) अजून निर्णय लागत नाही ! काय लिहिलंय् तुझ्या नशिबात, तेच कळत नाही ! आठवडा होऊन गेला, तरी अजून त्या मंडळींचं उत्तर नाही. ही काय रीत झाली ? इकडे मुलीच्या बाजूचा जीव कसा टांगणीला लागलेला असतो, ते त्यांना नाही समजणार. (थांबून) तू नुसती गप्प बसून राहा. काळजी एकट्या मी करायची ! लोक म्हणतील, पोरगी वाऱ्यावर सोडली. म्हणून मरमर मरतोय् ! नाहीतर आहे कोणी आजच्या दिवसांत एवढं करणारं ? पोटच्या पोरीसाठी कुणी खपणार नाही इतकं ! त्यातनं बँकेची नोकरी सांभाळून करतोय् ! रिकामा नाही तुझ्यासारखा ! (एकदम डोक्यात येऊन) आता हेच कुणी त्यांना सांगितलं नसलं, म्हणजे मिळवलं !—तुला नोकरी नसल्याचं ! तो करपे तरी काय ? तेव्हा लांब लांब बाता मारल्या ! मुलगी पसंत असल्याचं सांगायला लगेच धावत आला. आणि आता तोंड दाखवतोय् का, बघा ! येऊ दे साल्याला ! असा खडसावतो–(करपे येतात, त्यांना अत्यंत नम्रपणाने) या, करपेमास्तर, बसा, बसा. अग मीने, करपे आले. ऊठ ऊठ, बसून काय राहिलीस ? करपे आलेत बातमी घेऊन !

करपे : आलोय् , पण बातमी घेऊन नाही.

शिरधनकर : म्हणजे काय, मास्तर ? अहो, प्रकार काय आहे ?

करपे : अजून काही नाही.

शिरधनकर : म्हणजे अजून मुलगा काहीच बोलत नाही ? अहो, पण त्या दिवशी तर सगळे कसे हुरळून गेले होते...

करपे : आता मी काय सांगणार ? मृदुंगासारखी माझी अवस्था ! दोन्ही बाजूंनी मला थापा !

शिरधनकर : हिला नोकरी नसल्याचं कुणी सांगितलं तर नाही त्यांना ?

करपे : नसेल. तुम्ही असे एकदम धीर नका सोडू.

शिरधनकर : नाही– मी म्हणतो, त्याची तयारीच नसली काही बोलायची, तर दुसरं स्थळ बघायचं का आम्ही ?

करपे : असे एकदम हातघाईवर कशाला येताय् ? पोरं एकमेकांना आवडलीय्त, त्याचा काही विचार कराल, की नाही ?

शिरधनकर : (मीनाला) आता तू कशाला गप्प बसलीय्स ? बोललीस जरा मोकळेपणानं, तर तोंडातनं टपटप मोती का सांडणारेय्त ? लग्न व्हायचंय् कुणाचं ? तुझं का माझं ? त्यातनं आपली बाजू लंगडी. तुला धड नोकरी नाही आणि तो एवढा मोठा ऑफिसर...

मीना : (एकदम न राहवून) तो ऑफिसर नाहीये...

शिरधनकर : काय म्हणालीस ?

मीना : तो ऑफिसर नाहीये नि हे तुम्हांला चांगलं माहीतेय्. नसला, तरी बिघडत नाही. कारकूनसुद्धा माणूसच असतो. पण तुम्ही खोटं बोलू नका. मला अगदी कंटाळा आलाय् तुमच्या या खोटेपणाचा !

शिरधनकर : च्यायला, खोटं काय मी स्वतःसाठी बोलतोय् ? तुझ्याच भल्यासाठी ना जीभ विटाळून घेतोय् ? एवढी असेल मिजास, तर नाही करणार तुझ्यासाठी खटपट ! जा गावाला परत, अगदी उद्याच जा...

करपे : शांत व्हा, शिरधनकर, कशाला वाढवताय् शब्दानं शब्द ?

मीना : करपेमास्तर, प्लीज—दुसऱ्या स्थळाची एवढ्यात घाई नको. निदान महिना–दोन महिने तरी थांबू या...

शिरधनकर : का ? महिना, दोन महिन्यांत काय उजेड पडायचाय् ?

मीना : (पुढे येऊन स्वतःशीच)

महिना–दोन महिन्यांमधे मला नोकरी लागेल
आणि हा वेडावाकडा तिढा एकदा सुटेल !

मी त्याला म्हणेन अपुली
चिंता बघ, रे, मिटली
मग सरेल अमुच्यामधले
परकेपण उरले सुरले
अर्ज, कॉल, मुलाखती
वाटेवरून प्रीती
पगाराच्या पाकिटातून हृदयाला भिडेल
आणि हा वेडावाकडा तिढा एकदा सुटेल !

[एव्हाना रंगमंचावर अनेक स्त्री–पुरुष येऊन उभे. आपल्याच तोऱ्यात.]

मीना : महिना, दोन महिन्यांमधे मला नोकरी लागेल....

पहिला : महिना, दोन महिन्यांमधे ? हा हा हा हा हा
मला नोकरी मिळण्या लागली वर्षे तब्बल सहा !

मीना : (दुसऱ्याकडे जाऊन)
मला तेवढा वेळ नाही, हो, आहे जरा घाई,

दुसरा : सध्या आमच्या कंपनीत जागाच शिल्लक नाही !

मीना : ( तिसऱ्याकडे जाऊन ) तुमच्यापाशी बघा आहे का
कारकुनी जागा एखादी

तिसरा : तिच्यासाठी नऊशे अर्ज
आलेत तुमच्या आधी

मीना : ( थबकून चौथ्याकडे जाऊन ) लहानशी नोकरी चालेल !

चौथा : मंत्र्याची चिठ्ठी लागेल !

मीना : ( पाचव्याकडे जाऊन ) निदान टेंपररी तरी...

पाचवा : त्याच्यासाठी हवं डिपॉझिट
—वरती चिरीमिरी

मीना : ( सहाव्या बाईकडे जात, कळवळून )
कसलीही मज नोकरी द्या, हो– एवढी विनंती ऐका !

सहावी : ( चश्म्यातून तिच्याकडे रोखून पाहात )
हवी कशाला नोकरी ? तुम्ही लग्नच करून टाका !

मीना : ( विलक्षण थकलेली, सातव्याकडे जाते. )
नोकरीवाचून विरून जातील
माझी स्वप्नं सारी

सातवा : वुइ कान्ट हेल्प, वुइ कान्ट हेल्प, वुइ आर व्हेरी सॉरी

सगळे : व्हेरी व्हेरी सॉरी !

मीना : ( गळून गेलेली. घाम पुशीत सावकाश )
महिना, दोन महिन्यांमध्ये कशी नोकरी लागेल !
आणि हा वेडावाकडा तिढा केव्हा सुटेल ?

[ पडदा ]

# अंक दुसरा

[ बसस्टॉप. माणसांची रांग लागलेली. या रांगेत मीना उभी आहे. दुसऱ्या टोकाला कुठेतरी माधव कानविंदे उभा. दोघांनी एकमेकांना पाहिलेलं नाही. ]

गृहस्थ : (माधवच्या शेजारचा गृहस्थ माधवला विचारतो—) काय हो, ही बस फाउंटनला जाते ना, हो ?

माधव : हो.

गृहस्थ : काय हो, फाउंटनचं नाव बदललंय् ना, हो ?

माधव : ( त्रासून ) हो.

गृहस्थ : काय हो, पण अजून फाउंटन आहेच ना तिथं ?

माधव : हो !

गृहस्थ : काय हो, या दिवसांत फाउंटनला पाणी असेल काय, हो ?

माधव : ( सर्द. ) काय म्हणालात ?

गृहस्थ : नाही; म्हणजे ते कारंजं आता उडत असेल का, हो ? थुईथुई असं ?

माधव : ( चिडून ) मला माहीत नाही.

गृहस्थ : बस केव्हा येईल, हो ?

माधव : ( आणखी चिडून ) मला माहीत नाही.

गृहस्थ : इथली बस नेहमी लेट असते का, हो ?

माधव : मला माहीत नाही !

गृहस्थ : आल्यावर लगेच नंबर लागतो का, हो ?

माधव : ( ओरडून ) मला– माहीत– नाही...!!

गृहस्थ : ( शांतपणे ) तुम्हांला माहिती फारच कमी दिसतेय्.

[ माधवच्या ओरडून बोलण्यानं त्याच्याकडे चौघांपाच जणांचं लक्ष जातं. मीनाही पाहते. त्याच वेळी तो तिच्याकडे पाहतो. दोघांची नजरानजर होते. क्षणभर दोघांनाही काय करावं, ते सुचत नाही. मग ती

आपला नंबर सोडून सरळ माधवच्या शेजारी येऊन उभी राहते. काय बोलावं, हे दोघांपैकी कुणालाच कळत नाही. दोघं जागच्या जागी चुळबूळ करीत राहतात. ]

गृहस्थ : (मीनाला) अहो, तुम्ही नंबर सोडून आलात!

मीना : हो–मग?

गृहस्थ : आता बस आल्यावर तुम्हांला पुढं नाही जाता येणार.

मीना : नाही येणार. मग–?

माधव : (मीनाला) चला. आपण रांगेतून बाहेर पडू या.

मीना : चला. (गृहस्थाला) अहो, आम्ही नंबर सोडून जातोय्. दोघंही.

[ दोघंही बाहेर पडून चालू लागलेली. काय बोलावं, ही अडचण आहेच. ]

माधव : वैताग आणला होता त्या माणसानं! रांग सोडली, तेव्हा सुटलो.

मीना : अहो, पण– आता तुम्हांला उशीर नाही का होणार ऑफिसला?

माधव : होऊ दे. झाला एखादा दिवस, तर झाला. तुम्ही काय रोज रोज का भेटणार आहात?

मीना : कुठं चाललोय् आपण?

माधव : कॉफी पिऊ या. चालेल?

[ ती मानेनंच 'हो' म्हणते. ]

माधव : तुम्ही चालला होता कुठं पण—

मीना : (किंचित गोंधळून) अशीच. एका मैत्रिणीकडे.

[ दोघंही हॉटेलच्या फॅमिलीरूममधे जाऊन बसतात, न बसतात, तोच वेटर येऊन समोर उभा राहतो. ]

माधव : दो नेस्कॅफे! (वेटर जातो.) तुम्ही माझ्यावर रागावलात?

मीना : नाही. कशासाठी?

माधव : फार दमल्यासारख्या दिसता! तब्येत मागच्यापेक्षा खराब झालीय्.

मीना : काही तरीच. (पण तिच्या डोळ्यांत टचकन् पाणी येतं.) बरी आहे मी.

माधव : आयॅम सॉरी, मीना– मला—(पुढे बोलणार, इतक्यात वेटर हजर !)
वेटर : कॉफी !
माधव : हो. (त्याच्याकडे रागाने पाहतो. तो जातो.)
मीना : मी परत गावाला जायचं म्हणतेय्.
माधव : गावाला ?
मीना : हो– इथं शिरधनकरांवर तरी किती भार टाकायचा ? त्यांचे उपकारच घ्यायचे, की नाही ?
माधव : मीना...
मीना : गेला महिनाभर वेड्यासारखी नोकरी शोधतेय्. मिळतच नाही. मघा खोटं बोलले. मैत्रीण नाही न् काही नाही. एका कंपनीत चालले होते.
माधव : मग उशीर नाही होणार ?
मीना : होऊ दे. नाहीतरी गेल्यानंतर वाटाण्याच्या अक्षताच मिळायच्यात. नंतर सगळा दिवस खायला उठेल. त्यापेक्षा हा एवढा वेळ तरी तुमच्या बरोबर चांगला जाईल. (विषय बदलण्यासाठी) तुम्हांला कडू लागतेय् का कॉफी ? मी साखर घालते.
माधव : लक्षात आहे, वाटतं– ?
मीना : (फिसकन् हसते. मग) मला वाटलं होतं....सगळीकडे शोधत राहिलं, की महिना–दोन महिन्यांत नोकरी मिळेल. मग करपेमास्तर येऊन तुम्हांला कळवतील, आणि तुम्ही....
माधव : म्हणजे ? त्यासाठी तू नोकरी शोधत फिरलीस—म्हणजे माझ्यासाठी ? अग, काय दशा करून घेतलीय्स उन्हात फिरून !
मीना : घरी बसून तरी काय करायचं ? तुमच्याकडून काही कळलं नाही, म्हणून भाऊ चवताळलेत. घर नुसतं खायला उठतं मला. त्यापेक्षा उन्हात फिरणं परवडलं.
माधव : अग, पण मी काय कळवणार ? भाऊंनी तुझ्या अपेक्षा वाढवलेल्या, आणि मी साधा कारकून ! मग माझ्या पसंतीचा प्रश्नच कुठं येतो ? तू खरंच वाट पाहत होतीस माझ्या उत्तराची ?
मीना : हो.
माधव : मी ऑफिसर नसलो, तरीसुद्धा ?
मीना : तरीसुद्धा. खरं म्हणजे माझी अपेक्षाच नव्हती तुम्ही ऑफिसर असाल, अशी. (थांबून) समजा, मला नोकरी मिळाली, तर...म्हणजे...मला नोकरी मिळेपर्यंत तुम्ही माझ्यासाठी थांबाल ?

माधव : वेडी ! अग, नोकरीचं काय एवढं ? मी तुझ्याशी लग्न करायला तयारच आहे ! तुला नोकरी नसली, तरीही ! मला वाटत होतं, तुलाच मी कारकून म्हणून नको आहे !

मीना : म्हणजे आपण दोघं एकमेकांसाठी थांबलो होतो ! आणि तरी कदाचित एकमेकांना कायमचे अंतरलो असतो....आज बसस्टॉपवर भेटलो नसतो, तर ! गंमतच आहे ! आयुष्य किती छोट्या छोट्या योगायोगांवर अवलंबून असतं, नाही ? ( एकदम मोकळं वाटल्यासारखी हसत सुटते. तोही हसू लागतो. हसता हसता एकाएकी तिच्या डोळ्यांत पाणी येतं. ) मला समजत नाही का थांबलात तुम्ही माझ्यासाठी ? दुसरी एखादी आधी-पासून नोकरी करणारी मुलगी तुम्हांला मिळाली नसती का ?

माधव : असती, पण त्या दिवसापासून— मी दुसऱ्या कुणाचा विचारच केला नाही, मीना. ( तिचे हात हातात घेणार, इतक्यात वेटर येतो. )

वेटर : और कुछ ?

माधव : ( दातओठ खाऊन ) कुछ नहीं. ( वेटर बिल देऊन निर्विकारपणे जातो. )

मीना : पण तुमच्या आईची अट ? त्यांना नोकरीवालीच सून हवीये. त्यासाठी तरी मला नोकरी मिळेस्तोवर आपण थांबायला हवं.

माधव : कशाला ? तुला नोकरी आहेच, असं वाटतंय् तिला. लग्न होईपर्यन्त तरी तू काही बोलू नकोस.

मीना : पण हा खोटेपणा होईल !

माधव : काही नाही होत. खरं काय, ते मला सांगितलंयस ना ? मग झालं तर ! आईला सांगायची जबाबदारी माझ्यावर ! आपलं लग्न एकदा होऊ दे ! मग मी गोडीगुलाबीन आईची समजूत घालीन.

मीना : बरा, बाई ! मला तरी अगदी चोरट्यासारखं वाटेल !

माधव : काही नाही चोरट्यासारखं. हा सगळा घोळ तुझ्या खरं बोलण्यानंच झालाय् . अग, सत्य परवडायलासुद्धा माणूस घरचा बरा असावा लागतो. आपल्या परिस्थितीतल्या माणसांना अधनंमधनं खोटं बोलावंच लागतं.

मीना : मग—? मी मागू माऊंना— ठरलं, म्हणून—?

माधव : ठरलं, म्हणजे ? एकशे पाच टक्के ठरलं. मीना, या कॉफीच्या कपांना साक्ष ठेवून सांगतो— ( वेटर येऊन कॉफीचे कप उचलून नेतो. भयंकर चिडून ) या साल्या वेटरला...

[ निवेदक येतो. ]

निवेदक : तात्पर्य, लग्न ठरलं. अहो, हे एकेकाचे तीळ–तांदूळ असतात! मग तिथं ब्रह्मदेवच का, अगदी सरकारी कायदे आडवे आले, तरी काही म्हणजे काही फरक पडायचा नाही! माधवच्या आईला नोकरीवाली सून हवी होती न् मीनाला तर नोकरी नाही. तेव्हा तुम्हांलासुद्धा मध्यंतरी असं वाटायला लागलं होतं, की आता हे सगळं प्रकर्ण ओमफस् होणार! अगदी नाटकातले नायक–नायिका असले, तरीदेखील त्यांचं लग्न मोडणार! पण नाही– व्हायचं व्हायचं, असं बरेच दिवस घाटत असलेलं ते लग्न एकदाचं पार पडलं!

माधव : होणार होणार! होणार होणार!

कोरस : ज्या जाहिराती फडकत होत्या महिना, दोन महिने
ते लग्न झाले एकदाचे थाटामाटाने

तो हॉल ठरवून ठेवा
ती तारीख पाहून ठेवा
तो मुहूर्त काढून ठेवा
भटजीही शोधून ठेवा
जिलब्रीही एकदाच वाढा
हातावर मेंदी काढा
आणि विसरू नका तो कागदामधला इवला इवला पेढा
तो चिरेबंदी पेढा– तो पाव इंची पेढा
आणि विसरू नका तो कागदामधला इवला इवला पेढा
ते फोटो, ते हार
ते श्रीखंड, ते सार
तो शालू, ती सफारी
थोडी रोख, थोडी उधारी
कपडे शिवा, करा दागिने चढत्या भावाने
ते लग्न झाले एकदाचे थाटामाटाने

माधव : तसे आम्ही पहिल्यापासून चाकोरीच्या विरुद्ध
वाटायचं, हे संसार म्हणजे गाढवपणा शुद्ध
खर्च फुकटचा कशाला हवा?
त्याहून रंगीत टी. व्ही. घ्यावा—

23702

पण प्रसंग आला आमच्यावरती
ज्याची त्याची झाली सक्ती
' वहिवाट, ही वहिवाट–'
या ' वहिवाटी 'नं लावली आमची पुरती विल्हेवाट
अन् आम्हांलाही गुंडाळले अखेर चाकोरीने

कोरस : ते लग्न झाले एकदाचे थाटामाटाने

माधव : लग्न होणार, म्हणून होती केव्हाची हुरहूर
डोळ्यांमधली सुंदर स्वप्नं गेली निघून दूर !
आणि काय राहिलं ?
खिशात जमली अनपेड बिलं, डोक्यावरती कर्ज
ओठांमध्ये कडवट चव, खांद्यावरती ओझं !
अखेर आम्ही गृहस्थ झालो, असे समारंभाने
ते लग्न झाले एकदाचे– ! सॉरी हं, चुकलो–
ते लग्न नेहमीच व्हायचे असते थाटामाटाने !

मीना : माझं एक ऐकाल का ?

माधव : एक ? अग, आपलं लग्न झालंय्. आता सबंध जन्मभर तू बोलायचं आणि मी ऐकायचं.

मीना : चला– मला नाही हं आवडणार तुम्ही जे ते ऐकलेलं. तुम्ही घरातले कर्ते पुरुष– तुमचंच मत घरात चालायला हवं.

माधव : असं संसाराच्या सुरुवातीला सगळेच म्हणतात. पुढं काय होईल, ते खरं. पण विचारत काय होतीस ?

मीना : मी विचारत होते– रेल्वेचं रिझर्व्हेशन झालं का, म्हणून !

माधव : आत्ता होईल. अग, आपली ओळख आहे रेल्वेत.

मीना : आणि हॉटेलचं काय केलंत ?

माधव : इथूनच केलंय् रिझर्व्हेशन. नाहीतर आयत्या वेळी फूटपाथवर करावा लागेल हनीमून !

मीना : सगळं नक्कीच झालंय्, म्हणजे प्रश्न नाही. पण मी म्हणत होते, की आपण हनीमूनला कशाला जायला हवं ?

माधव : काय ? हनीमूनला कशाला ? अग, हनीमूनला जायचं नाही, तर लग्न कशासाठी केलं ?

मीना : आपण दोघं असताना– इथंच नाही का होणार मधुचंद्र ?

माधव : आयला– म्हणजे माझं इतक्या लहानपणापासूनचं स्वप्न– मधुचंद्राला जायचं हे—आणि तू ते–

मीना : मी नाही– आपण! लग्नाच्या समारंभानं कसे बोअर झालात, तसे गांजून जाल प्रवासानं नि खर्चानं. सगळं स्वप्न विरून जाईल. त्यापेक्षा आपण ते स्वप्न सध्या तसंच बाजूला ठेवू. आधीच लग्नाचा खर्च डोईजड झालाय्. त्यातनं जरा सवड झाली, की मग जाऊ.

माधव : म्हंजे शेवटी हेच नं– की आता पैसे नाहीत, म्हणून हनीमून कॅन्सल्ड !

मीना : कॅन्सल्ड नाही– पोस्टपोन्ड ! आधीच मला नोकरी नसताना माझ्यावर खर्च होतोय्. त्यात हा खर्च नको. आपण सगळीकडे पैसे वाचवू नि लग्नाची देणी पहिल्यांदा देऊन टाकू.

माधव : कमाल आहे ! हे कधी आलं तुझ्या डोक्यात ?

मीना : आणि, किनई, नवीन लग्न झालेलं, म्हणून उगाच उधळमाधळ करायची नाही. चांगली दिसली, म्हणून माझ्यासाठी साडी आणणं, गजरे–वेण्या आणणं, नाटका–सिनेमाची तिकिटं काढणं हे सगळं सगळं....

माधव : पोस्टपोन्ड—फॉर एव्हर.

मीना : फॉरेव्हर नाही. कधीपर्यंत ?

माधव : म्हातारं होईपर्यंत.

मीना : असं चिडायचं नाही. फक्त चार दिवस असे काढायचे. मला नोकरी मिळेपर्यंत...

एकदा नोकरी लागू दे
थोडी रजा साठू दे
जरा शिल्लक जमू दे
मग करायची की मौजच मौज, कळ काढा तोवर
टाकुन देऊ स्वप्नं आपुली थोडी लांबणीवर

सोसू थोडे चटके आपण तापल्या उन्हाचे
राखून ठेवू, गडे, चांदणे अपुल्या मधुचन्द्राचे

माधव : तोवर मी म्हातारा अन् तू जख्ख बुढ्ढी
काठी घेऊन प्रवासाला निघेल आपली जोडी

मीना : असेल जरि का आयुष्याची तेव्हा मावळती
आपण काढू बासनातुनी कोरी नवी प्रीती
येईल अपुल्या आनंदाला कायमचा बहर

टाकुन देऊ स्वप्नं आपुली थोडी लांबणीवर

माधव : मग ठरलं. मधुचन्द्र पोस्टपोन्ड इन्डेफिनेटली !

मीना : आणि हे बघा, आईंना पण सांगून टाकायचं एकदा माझ्या नोकरीचं. त्याशिवाय मला नाही चैन पडणार ! म्हणावं—केली लबाडी. पण तुम्ही रागावू नका. आम्ही शोधतोच आहोत नोकरी.

माधव : आत्ता सांगतो, बघ. अग, आहे काय नि नाही काय ? आईला एखादी गोष्ट कशी पटवून द्यायची, याची टॅक्ट मला बरोब्बर साधली आहे !

[ आई फुलवाती करीत बसलेली. तिच्याबरोबर लता. तिच्याजवळ जाऊन ]

माधव : तुला एक सांगू, आई....

आई : काय सांगतोयस ? अन् चाचरतोयस का असा ? मी लग्नापासून पाहतेय्, माधव, तुझं लक्षण धड नाही. गोंधळल्यासारखं करतोयस. नवीन जबाबदारी खरी. पण त्यात काय आहे एवढं ! सगळ्यांची लग्नं होतातच, की नाही ? त्यातनं तुला बायको मिळालीय् नक्षत्रासारखी ! एवढी नोकरी करणारी मुलगी, पण कसला तोरा नाही !

माधव : तेच सांगत होतो, आई...

आई : एकसारखी कामं शोधत असते. मी म्हटलं तिला, की उद्या रजा संपली, की कुठनं करणारेयस मदत ? आणि मदत काय फक्त हातानंच का होते ? पैशाची मदतसुद्धा...

[ लता हसते. ]

माधव : लता, तू जा बरं बाहेर. इथं हसत बसलीयस ती. मोठ्या माणसांच्यांत काय आहे तुझं ?

लता : जाते, बाबा, हु हु हु ( अनावर हसत मीनापाशी येते. )

मीना : काय झालं, लतावन्स, हसायला ?

लता : काही नाही. तुझ्या नोकरीचं सांगायला गेलाय् दादा. अशी जाम फाफलली आहे ! ( दोघीही हसत सुटतात. )

माधव : म्हंजे, आई— तुला सांगितलं. तर पटायचं नाही ! पण नोकरीचं एवढं महत्त्व नाही, म्हंजे नोकरीचं आहे— पण बायकांच्या नोकरीचं नाही.

आई : वा, रे, मला शिकवतोय्. आता मिळाली नोकरीची बायको, म्हंजे तिची किंमत नाही मी साफ सांगते, तिच्याविरुद्ध एक शब्द ऐकून घ्यायची नाही मी. खुशाल करू दे तिला नोकरी— सगळं काम करायला मी एकटी

समर्थ आहे. नाहीतरी इतकी वर्षं आलेच की रामरगाडा उपशीत! फार काढलं, बाबा, आम्ही! श्रमाचं काही वाटत नाही; पण दिडकीला दिडकी जोडत बसायचं, म्हंजे नको जीव होतो. अरे, म्हणून तर हट्ट धरला नोकरीवाल्या सुनेसाठी!

माधव : (शेवटचा प्रयत्न) ते खरं आहे, आई, पण....

आई : आणि तिनं नोकरी सोडायची बिडायची असलं काही म्हणत असशील, तर आधी काढून टाक ते डोक्यातून. तुम्हां पुरुषांना म्हंजे चोवीस तास बायका आपल्या सेवेला हव्यात. पण त्या हौशी टिकतात चार दिवस, नि नंतर म्हणायला लागता, की मी दमून येतो न् तू झोपा काढतेस. मग ती बायको बिचारी ढोरासारखी राबेना का घरात! घरात राबण्याची म्हंजे किंमत नाही. कारण त्याचे थोडंच कुणी चार पैसे देतं? बरोबर, की नाही?

माधव : (आईच्या सरबत्तीपुढं असहाय) बरोबर.

[माधव आईजवळून उठून मीना–लता बसल्या आहेत, तिथ येतो.]

मीना : सांगितलंत आईंना?

माधव : नाही. (थांबून) अग, ती मला बोलू देईल तर ना? एकसारखं तुझंच कीर्तन लावलं होतं. (मीना हसते.) हसा–हसा आमच्या बावळटपणाला! म्हणा– एवढं सांगतो म्हणालात शूरासारखे आणि घेतलीत, की नाही माघार? म्हणा– आमच्या भाऊसारखीच तुम्हाला फुकटची हुशारी दाखवायची सवय! म्हणा–

मीना : मी काही तरी म्हणतेय् का?

माधव : उघड बोलत नाहीस, पण मनातल्या मनात म्हणत असशीलच. मग गप्प का? बोलून टाक एकदा मी तयार आहे. तिचं ऐकून घेतलं, आता तुझं ऐकून घेतो.

लता : एवढं कशाला हवय? मीच टाकते सांगून!

माधव : लता– बघ, हो, लता...

[लता आईकडे पोचलेली.]

लता : बरं का, आई. परवा ते म्हणत होतीस ना त्या जुन्या भाड्यांचं–

आई : हो, ग. लग्नात नवीन आलीत. त्यांना नाही जागा. जुनी भाडी डाग लावून चालणार असतील, ती ठेवणार, नाहीतर सरळ मोडीत काढणार. पण

काम काढून बसेन हिच्या जिवावर, आणि ही होईल चालती हपिसात मेली, रजा तरी कधी संपतेय् तिची ?

लता : तू खुश्शाल काम काढ, आई, वहिनी कुठं जायची नाहीये.

आई : म्हंजे, ग ?

लता : म्हंजे वहिनी नोकरीच करीत नाही, आई!

आई : (मटकन् खाली बसून) अग, काय, सांगतेस काय ?

लता : नोकरी करीत नाही, म्हंजे आत्ता करीत नाही. मिळेल, तेव्हा करील.

आई : मिळेल, तेव्हा, म्हंजे ? मग सांगितलंन् कशाला आधी आहे नोकरी, म्हणून ? अन् लग्नासाठी झालेलं ते सगळं कर्ज–ते कधी फेडायचं ! नोकरी शोधल्यावर मग ?

लता : बघ. तू असं तारांगण करणार, म्हणूनच कुणी बोललं नाही तुझ्याकडे.

आई : (माधवकडे येऊन) माधव, आधी त्या करपेमास्तराला माझ्यासमोर आणून उभा कर.

माधव : अग, पण, आई....

आई : मला तुझ्याशी एक अक्षर बोलायचं नाही. माझ्यासमोर तो करप्या उभा राहू दे. चांगलं तासडायचंय् त्याला.

मीना : पण, सासूबाई– सगळी चूक माझी....

आई : (ओरडून) सासूबाई म्हणू नकोस मला. असल्या लबाड माणसांशी मला संबंध ठेवायचा नाही! त्या करपे मास्तराला घेऊन या– मी त्यांना विचारणारेय्–

[ करपेमास्तर आलेले. ]

आई : मास्तर, तुम्ही आम्हांला समजलात कोण ? आम्ही सभ्य माणसं आहोत आमच्याकडे अशी बनवाबनवी करायची गरज काय होती ? राहिलं असता माझा मुलगा लग्नावाचून; पण नोकरी न करणारी मुलगी खुश्शाल नोकरीची म्हणून त्याच्या गळ्यात बांधलीत !—आणि ती माणसं तरी अशी कशी ? मुलगी खपवण्यासाठी काय वाट्टेल ते सांगायचं ?

करपे : (अधिकाधिक अस्वस्थ) त्या माणसांना आणखी कशाला बोलताय् ? मी एकटा ऐकून घेतोय्, ते पुरे नाही का ?

मीना : बोलू दे, मास्तर. चूक आमचीही आहे. नुसत्या मामांचीच नाही. माझीसुद्धा.

आई : प्रश्न नुसता नोकरीचा नाहीये, मास्तर, प्रश्न विश्वासाचा आहे. इतके

दिवस मी तुम्हांला विश्वासू समजत होते— त्याची आता काय किंमत राहिली ? आजवर बघा, मास्तर, आम्ही इतक्या प्रसंगांमधून गेलो, पण कधी कणभर लबाडी नाही केली. मला भारी चीड येते लबाडीची. लबाड माणसाशी मी बोलायचीसुद्धा नाही.

करपे : झालं तुमचं बोलून ? आता मला बोलू द्या. तुम्ही जन्मात लबाडी केली नाहीत, मी केली. पण लताच्या आई, लबाडी करणं न करणं एवढ्यावर काय आहे ? लबाडी न करता याला दुसरी नोकरीवाली मुलगी दाखवता आली असती. अशा कितीतरी मुली माझ्या लिस्टात होत्या. पण मी, खोटं बोलून का होईना, हीच मुलगी खपवली. मला पश्चात्ताप नाही, लताच्या आई. तुमचा मुलगा चांगला आहे. त्याला ही अशीच गोड मुलगी मिळायला हवी होती. कशी पाखरासारखी जोडी आहे ही ! ही जोडी जमण्याशी मला कर्तव्य होतं. मग लबाडीबिबाडी गेली खड्डयात ! ही अशी जोडी जमवली, म्हणून चित्रगुप्त माझ्या खात्यावर जे बचकभर पुण्य लिहील ना, लताच्या आई, त्यात माझ्या लबाडीचं चिंचोकाभर पाप सहज खपून जाईल !

आई : तुम्ही काय वाटेल ती सारवासारव करा, मास्तर, मला आता तुमचा कणभराचा भरवसा वाटायचा नाही.

करपे : नको वाटू दे. मी हिच्यासाठी नोकरी शोधली न् तुमची सून नोकरीवाली झाली, म्हणजे झालं, की नाही ?

आई : काही सांगू नका. आता तुमच्याकडून कसली म्हणून आशा नाही.

[ करपे मोठमोठ्यानं हसतात. आता ते परत निवेदक झालेले. ]

निवेदक : इतरांनी कितीही हसण्यावारी नेलं, तरी बाई मनाला लावून घेईल. फार लावून घेईल. किती झालं, तरी जुनं कठीण लाकूड ते. आतल्या गाठीचं.

[ माधव साडीचा बॉक्स उघडून दाखवतो. ]

माधव : काय, हो, कशी आहे साडी ?

निवेदक : आवडलीय् ना ? मग घेऊन टाका की.

माधव : घेऊन काय टाका ? घरून बंदी आहे. साडी घेतली, तर बायको भलतीच संतापेल.

निवेदक : काय म्हणालात ? साडी घेतल्यावर संतापेल ? अजब्रच दिसतेय् तुमची बायको !

माधव : तर ! तुम्ही पाहिली नाही अजून तिला.

निवेदक : पाहिलीय्. लग्नाला आलो होतो ना मी ? रामदासांचा दासबोध– रेशमी बांधणी– प्रेझेन्ट दिला, तो मीच !

माधव : दासबोध प्रेझेंट दिला ? लग्नात ? छान !–आयडिया, अहो, तुम्ही दासबोधा-ऐवजी ही साडी प्रेझेंट दिली असती, तर–किंवा दासबोध आणि ही साडी !

निवेदक : ही साडी ? मी– प्रेझेंट ?

माधव : घाबरू नका, हो. पैसे नाही द्यायला लावत तुम्हांला. पण नाव तुमचं. म्हणजे साडी सेन्सॉर पास होईल.

[ साडीचा बॉक्स मीनाच्या पुढे धरतो. ]

माधव : आवडली ?

मीना : न आवडायला काय झालं ? सुंदरच आहे...

माधव : मलासुद्धा आवडली. ही साडी पाहिल्याबरोबर एकसारखी तूच आठवायला लागलीस. डोक्यात यायला लागलं, की ही नेसल्यावर तू कशी दिसशील– नेसताना कशी दिसशील....

मीना : फाजीलपणा करू नका. साडीवर खर्च करायचा नाही, असं ठरलं होतं.

माधव : हो– पण ही साडी तुला भलतीच चांगली दिसेल, म्हणून– आणि खर्च मी कुठं केलाय् ? तो आपला हा, ग– काय त्याचं ते नाव–त्यानं लग्नाचं प्रेझेंट दिलं...

मीना : बरं झालं, बाई. मलासुद्धा आठवत नव्हतं....

माधव : काय ?

मीना : हा शेविंग सेट देणाऱ्याचं नाव !

माधव : मीना, मीना, धिस इज, सांगतो, टू मच ! शेविंग सेट या महिन्याच्या बजेटमधे नव्हता.

मीना : दोन केस राहिलेत ब्रशाचे आणि रेझर गंजलाय्. बजेट कसलं घेऊन बसलात ?

माधव : असं कसं ? तत्त्व, म्हणजे तत्त्व !

मीना : मी खर्च केलाच नाहीये पण ! प्रेझेंट आहे हे– लग्नाचं. तुमच्या त्या ह्यानं दिलेलं.

माधव : कुणी ?

मीना : ज्यानं साडी दिली, त्यानंच ! म्हणाला, प्रेझेन्ट एकट्या बायकोलाच देऊन कसं चालेल ? ( दोघंही हसतात. मग गंभीर होऊन ) फार ओढाताण

होते नाही, हो-? कधी मिळेल मला नोकरी ?

माधव : —मिळेल !

मीना : नुसत्या पैशांसाठीच नाही मी म्हणत.

माधव : मग ?

मीना : सासूबाईसाठीही म्हणते.

माधव : तिचं काय ?

मीना : बोलतसुद्धा नाहीत माझ्याशी. इतक्या दुराव्यानं वागतात ! सुरुवातीला माझ्यावर एवढी माया केली– वाटलं, की आईच परत भेटली ! पण आता बघा ना, शब्दालासुद्धा महाग झाल्यायत् !

माधव : आपण फसवलंय् ना तिला ? मग तिला रागवायचा अधिकार आहेच.

मीना : पुरुषमाणसाचं ठीक असतं. तुम्ही बाहेर जाता. आम्ही घरात एकत्र? राहायचं आणि एकमेकींशी धड बोलायचंही नाही, म्हणजे...

माधव : आईला तरी समजायला हवं. मिळेल नोकरी. थोडं थांबायला नको नोकऱ्या काय आभाळातून पडतात ?

मीना : परवा चिरपुटकर भेटली होती. बघते म्हणालीय् नोकरीचं. तोवर तुम्ही घाला ना कशीतरी आईची समजूत.

माधव : हे बघ, आई, एका घरात राहून हे असं चालायचं नाही.

आई : काय चालायचं नाही ?

माधव : हे तुझं मीनाशी न बोलणं ! तिला किती वाईट वाटतं, याची तुला काही कल्पना आहे ? झाली चूक होऊन गेली. तीच पुन्हा पुन्हा उगाळण्यात काय अर्थ आहे ?

आई : पुन्हापुन्हा उगाळायची नाही, म्हणूनच ना गप्प बसलेय् ? बोलले, की माझं तोंड वाजतं. मग काही मी शिवीगाळी केल्याशिवाय थांबत नाही. त्यापेक्षा आपला राग गिळून गप्प बसावं, म्हणते मी. तर तेही तुला खपत नाही. बरी आठवण झाली यावरनं. या महिन्यापासनं दूध वाढवायला हवं.

माधव : आई, विषय बदलू नकोस.

आई : सांगते, ऐकून घे. फार नाही. पण पावशेर तरी वाढवायला हवं.

माधव : परिस्थिती बघतेयस, आई—दूध कसं वाढवणार ? सगळं जेमतेम नीट चाललं होतं; पण या लग्नानं घोळ केला, बघ. काय करणार ? रोजचा खर्च कमी करून देणी भागवतोय्.

आई : स्वतःचा खर्च कमी कर थोडा. परवा तो दाढीचा सेट कशाला घेतलास ?

माधव : तो...आई...मला...

आई : काही सांगू नकोस. पावशेर दूध वाढवायलाच हवं. अरे, ती पोरगी

नोकरीसाठी दिवसभर उन्हातनं याच्याकडे जा–त्याच्याकडे जा, करते, तिला कपभर दूध नको का रात्री ? चिमणीएवढं तोंड करून घरी परत येते ! अशानं आजारी पडायची. मारे लांब लांब गोष्टी सांगतोस, आणि त्या पोरीसाठी दूध वाढवायचं, तर हिशेब करतोस ?

माधव : कमाल आहे तुझी, आई, इतकं सगळं समजतं, तर तिच्याशी बोलत का नाहीस नीट ?

कमाल आहे तुझी, आई– कमाल, आई
तुला म्हणू तरी काय, मला समजत नाही

कधी वागतेस समजुतीनं
केव्हा करतेस तारांगण
कधी बोलतेस जीवघेणं
केव्हा रागावणं नि रुसणं
यात तुला तरी कुठनं
मिळतं मोठं समाधान
मला समजत नाही– मला समजत नाही
कमाल आहे तुझी, आई, कमाल, आई !

मीना : लता जाते शाळेमध्ये
तुम्ही असता ऑफिसमध्ये
दोघीच असतो आम्ही घरात
गप्प गप्प आपल्याच कामांत
शब्दांवाचून देतो घेतो
नजरसुद्धा टाळत राहतो
अहो, याचा त्रास होतो
दिवस नुसता खायला येतो
बोलायला मी गेले, तरी आई बोलत नाहीत
आई बोलत नाहीत– आई बोलत नाहीत

लता : बोल, ग, तिच्याशी– बोल, ग, आई

आई : बोलू तिच्याशी ? बोलू मी कशी ?
या गावचा त्या गावचा
मामा हिचा आला

खोटं बोलून गेला
नोकरी नाही हिला
बोलू मी कशी?

माधव : आज उद्या सारं काही
ठीक जाईल होऊन
आणि काहीही म्हण
तुला आवडलीये सून
जीव राहून राहून
तुझा तुटे तिच्यापाठी
मग उगाच कशासाठी
ह्व्यात नसत्या कटकटी
असा अबोला ही कट्टी
किती काळ चालायची, मला समजत नाही
कमाल आहे तुझी, आई– कमाल, आई!

आई : बोलू मी कशीऽ
या गावचा, त्या गावचा
मध्यस्थी आला
खोटं बोलून गेला
नोकरी नाही हिला
बोलू मी कशी!

मीना : (व्याकुळपणे) रुणझुणत्या पाखरा,
तू ये माझ्या सासरा
सांग सासूबाईंना
रुसवा आता पुरे करा

आई : मग! दूध उद्यापासनं सांगायचंय्. सांगू, का नको?
माधव : सांग.
आई : आणि तुझ्या बायकोला म्हणावं, ती भांडी मोडीत न्यायचं काम काढतेय् उद्या. शक्य तर जाऊ नकोस कुठं.

[ चिरपुटकर येते. ]

चिरपुटकर : काय टेरिब्ली लकी आहेस, मीना, तू ! आमची ॲड फर्म आहे नं, तिथं मी नुसती इन्क्वायरी केली– तर आत्ताच एक व्हेकन्सी खाली झाल्याचं समजलं. मी लगेच तुझं नाव सजेस्ट केलं.

मीना : खरंच ? मला मिळेल हा जॉब ?

चिरपुटकर : मिळेल म्हंजे–हंड्रेड पर्सेन्ट ! मी सांगितल्यावर बॉस काय ऐकल्याशिवाय राहील ? जॉब तर देईलच, पण जरा त्यांची मर्जी संभाळलीस, तर प्रमोशन्स सुद्धा देईल भराभ्भर.

मीना : त्याची मर्जी सांभाळायची ?

चिरपुटकर : अग, ते काही इतकं कठीण नाहीये. भलताच हॅंडसम आहे हा बॉस. आणि इतका जॉली आहे ! स्टेट्समधून शिकून आलाय् जाहिरातीचं मॉडर्न टेक्निक ! मॅनर्स तर इतके पॉलिश्ड आहेत ! तुला पाहिल्याबरोबर आवडेल बघ तो !

मीना : कोण जाणे ! मला हा जॉब जमेल, की नाही...

चिरपुटकर : न जमायला काय झालं ? या जॉबनं बघ, तुझं आयुष्यच पालटून जाईल. मध्यमवर्गाच्या कळकट–मळकट दुनियेतनं तू एकदम एका ब्रॅंड न्यू वर्ल्डमधे जाशील. अ डॅझलिंग, स्पार्कलिंग, सिझलिंग न्यू वर्ल्ड ! पण त्यासाठी एक करावं लागेल.

मीना : काय ?

चिरपुटकर : हा तुझा काकूबाईपणा सोडावा लागेल ! सगळा मिड्‌लक्लास लूक बदलून एकदम सोसायटी गर्ल व्हायला लागेल.

मीना : म्हंजे ?

चिरपुटकर : म्हंजे काय ? अग, आजकाल कुठंही नोकरी मिळवायची, तरी हा असला काकूबाईचा अवतार चालत नाही.

काकूबाई, काकूबाई, काकूबाई,
असं राहून आजकाल चालेल कसं
जिथं जाशील, तिथं तुझं होईल हसं
तुझा निभाव इथं लागायचा नाही
काकूबाई, काकूबाई, काकू ऽ बाई ।

[ दोघी–तिघी फॅशनेबल मुली येतात. ]

पहिली : घरंदाज साड्या नि लांबलांब बाह्या

मिळवल्या मुलीला कशाला ?
रुंद गळ्याची नि बिनबाह्याची
पोल्की नेहमी वापरायची

दुसरी : विलायती झुळझुळीत साडीमधून
सारं शरीर घेईल नजर वेधून

तिसरी : ओठांचा रंग कपड्याशी जुळव.
केसांचा संभार कापून सजव.

चिरपुटकर : लाडेलाडे हळू बोलत जावे
पुरुषांचे जमवावे भोवती थवे
एवढ्या धड्यांचा करशील जर अभ्यास
तर, समज, मुठीत तुझ्या आलाच बॉस !

[बॉस येतो.]

बॉस : (अत्यंत लाडिकपणे)
आता राहू दे काम, तुम्ही थकला असाल
फ्रेश होण्यासाठी ज्यूस प्यायला याल ?
नाहीतर ऑफिसनंतर शांत निवान्त
जाऊ एअरकंडिशन्ड बड्या हॉटेलात
तिथं बिअर मिळेल– तुम्हांलाही चालेल
नाहीतर माझ्या हट्टासाठी जीन घ्यावी लागेल
आज आहे माझा हॅपी बर्थडे
म्युझिकवर डान्स करू होऊन वेडे

(इतर मुली येतात. बॉस प्रत्येकीबरोबर नाचतो.)

वेडे वेडे वेडे वेडे
आउट ऑफ द वे डे
आउट ऑफ द वे नाइट्
व्हाइल द सन् शाइन्स ब्राइट
डान्स विथ् ऑल युअर माइट

(बॉसची हुकुमत वाढती. मीनाची वाढती भीती.)

बॉस : उशीर झाला ? होऊ दे ! घरी कशाला जाता ?
आजची रात्र इथंच राहा ना विसरून सारी चिंता
अशा रंगत जातील रात्री दोघांच्या सोयीनं
नोकरीमध्ये आणि मिळतील भरभर प्रमोशनं

मीना : ( विलक्षण घाबरलेली )
नाही नाही– असलं काही मला जमणार नाही !

सगळ्या : काकूबाई, काकूबाई, काकूऽबाई !

[ तिच्यावर बोट रोखून पुन्हापुन्हा तेच म्हणत सगळ्या जातात. ]

मीना : असू दे मी काकूबाई ! मला काकूबाईच राह्यचंय् ! मला नाही चिरपुट-करसारखं करिअर गर्ल व्हायचं. आणि व्हायचं असतं, तरी ते आता जमणार नाही. माझा नवरा–माझी सासू–माझी नणंद–मी वेडीवाकडी वागले, तर त्यांना काय वाटेल ? वाटेल तशी फॅशन केली, तर त्यांना कसं चालेल ?

सगळ्या : ( परत येऊन ) काकूबाई, काकूबाई, काकूऽबाई ! ( जातात. )

मीना : अहो, मला वाटतं, मी तुमच्यासारख्याशी लग्नच करायला नको होतं !

माधव : मीना– वाटेल ते काय बोलतेस ?

मीना : खरंच– तुम्ही नोकरीवर जाता, बाहेर इतक्या छान छान फॅशनेबल मुली बघता. तुमच्या नसेल मनात येत, की या सगळ्या चांगल्या चांगल्या मुली सोडून हे ध्यान कुठनं आपल्या पदरात पडलं ?

माधव : वेडीच आहेस. असं काहीतरीच कसं येईल माझ्या डोक्यात ?

मीना : खरंच नाही येत ? खरंच नाही ? सांगा ना–मी–सांगा ना–मी खरंच आवडते का तुम्हांला ?

माधव : मी नाही सांगणार !

मीना : का ?

माधव : कशाला सांगायचं ? मी, आवडतेस, म्हणायचं आणि उद्या नोकरी मिळाल्यावर बाहेर तुला छान छान फॅशनेबल पुरुष दिसले, तर तू काय म्हणणार ?

मीना : काय म्हणणार ?

माधव : हे असले चांगले चांगले लोक असताना कुठनं हे ध्यान माझ्या गळयात पडलं– असं नाही म्हणणार ?

मीना : (फुरंगटून) मा –रीन हां मी तुम्हांला !

[एकदम करपे येतो.]

करपे : मिने– मिने, काय चाललंय् ?

मीना : (लाजून) मी जाते चहा करायला.

करपे : चालली– चालली पाखरं उडून. काही जायचं नाही, मिने. बस इथंच. तुझ्यासाठीच तर आलोय्.

मीना : माझ्यासाठी ?

करपे : हा पत्ता. उद्या सकाळी बरोबर अकरा वाजता जायचं इंटरव्ह्यूसाठी.

मीना : अय्या—

करपे : मी बोलून ठेवलंय्. भडकमकर म्हणून गृहस्थ आहेत त्यांच्याकडे. त्यांनाच जाऊन भेट.

माधव : थँक्यू, करपेमास्तर.

करपे : कपाळाचं थँक्यू. आधी नोकरी मिळू दे. मग माना आभारबिभार.

[ऑफिस. भडकमकरांच्या समोरच्या खुर्चीत मीना.]

भडकमकर : तुमच्याविषयी मला सांगितलंय् करपेमास्तरांनी. मास्तर आमच्या छोकऱ्याला शिकवायला येतात. तुमच्या घरी कोण कोण आहे ?

मीना : सासूबाई आहेत. धाकट्या वन्सं आहेत.

भडकमकर : मुलंबिलं ?

मीना : (किंचित लाजून) नाही. अजून नाहीत.

भडकमकर : मिस्टर कानविंदे काय करतात ?

मीना : एजीत आहेत.

भडकमकर : करपेमास्तर म्हणत होते, की तुम्हांला नोकरीची फार गरज आहे. काय, खरं, की नाही ?

मीना : (एकदम) होय, हो. केव्हापासून ! (मग तोल सावरून) गरज तर आहेच.

भडकमकर : तुमची क्वालिफिकेशन्स कमी पडताहेत. पण तेवढ्यानं बिघडत नाही. काम मात्र चोख हवं. नाहीतर नुसत्या डिगऱ्यांचा काय उपयोग ? खरं,

की नाही ? संस्कृत घेऊन एम्.ए. झालेला मुलगा बँकेत नोकरीला लागतो. तिथं शाकुंतल काय उपयोगाचं ? करायचं क्रेडिट डेबिटच. साहेब सांगेल, तशी व्हाऊचरं बनवायची. करायचं काय शिक्षण ? खरं, की नाही ? तेव्हा डिग्र्या नकोत. पण इथं ऑफिस माझ्या मनासारखं चालायला हवं, म्हणजे माझं म्हणणं ऐकायला हवं, काय ? माझं म्हणणं ऐकायलाच हवं...

[ एकट्या मीनावर प्रकाशझोत. एखादी रेकॉर्ड अडकावी, तसे भडकमकरांचे शब्द पुन्हा पुन्हा ऐकू येत राहतात...]

भडकमकर : मी सांगेन, ते ऐकायला हवं...माझं सांगणं मानायला हवं...

[ भडकमकर बसल्या जागेवरून उठून येतात. आणि तिच्या खांद्यावर हात ठेवतात. ती चपापते; पण काहीच करू शकत नाही. अस्वस्थपणे चुळबूळ करीत बसून राहते...पुढील भागात भडकमकर खोट्या गोड आवाजात बोलतात. ]

भडकमकर : काय, खरं की नाही ! ऐकणार ना, मी म्हणेन, ते ?

मीना : सगळीकडे हेच. चिरपुटकरनं आणलेला जॉब मी यासाठीच तर पत्करला नाही...

भडकमकर : सगळीकडे हेच असतं, मिसेस् कानविंदे. वरच्या माणसानं सांगितलेली कामं खालच्या माणसाना ऐकावीच लागतात. वरच्या माणसांना खूश ठेवावंच लागतं. नाहीतर ऑफिसेस् चालायची कशी !

मीना : ( काकुळतीला येऊन ) नोकरी म्हटली, म्हंजे हे येणारच का ?

भडकमकर : अर्थातच. ऑक्युपेशनल हॅजर्ड्स. नोकरी करणाऱ्या कुठल्याही बाईला तुम्ही विचारून पाहा.

मीना : पण माझं लग्न झालंय्.

भडकमकर : तुम्ही संसारी, म्हणून तुम्हाला कामामध्ये सवलती देऊ. काय, खरंय्, की नाही ! थोड्या दिवसानी मिस्टर कानविंद्यानाही सवय होईल या गोष्टीची.

मीना : मी...मी उद्या सांगेन.

भडकमकर : चालेल. यू आर् वेलकम्. एनी टाईम. नाहीतर असं करा. उद्या रात्री घरीच याल का !

मीना : रात्री ?

भडकमकर : म्हणजे संध्याकाळी–पण आम्ही घरी पोचेपर्यंत रात्रच होते. खरं ना ? मग वाट पाहू रात्री ? ( हसतो. )

[ एवढयात लता कुठूनतरी येते. ]

लता : काय झालं, वहिनी ? घाबरलीसशी ?

मीना : लतावन्सं ? ( तिला गच्च मिठी मारते. )

लता : इंटरव्ह्यूचं काय झालं, वहिनी ? मिळाली नोकरी ?

मीना : हो. पण घ्यायची, की नाही, तेच समजत नाही.

लता : असं नको करू. एवढया कष्टानं मिळतेय्...

मीना : यांना चालेल त्या तसल्या नोकरीचा पगार ?

लता : का नाही ?

मीना : कसं सांगू, वन्सं ? तुम्ही लहान आहात. तुम्हांला कळायचं नाही.

लता : मला सगळं कळतं, वहिनी. मी ऐकते ना सगळीकडचं ? ( थांबून ) नोकरीवरचा साहेब वाईट आहे, होय ना ?

मीना : त्यानं मला बोलावलंय् उद्या रात्री.

लता : घाबरू नको. जरूर जा तू. आणि चांगली खडसावून ये. म्हणावं, नको तुझी नोकरी ! अशी खरडपट्टी काढ, की पुन्हा कुणाच्या वाटेला जायचा नाही !

[ मीना भडकमकरांच्या घरी. ]

मीना : मी आलेय्. तुम्ही आज रात्री बोलावलं होतं.

भडकमकर : मग ? ठरला तुझा विचार ?

मीना : ठरला.

भडकमकर : शाब्बास ! मला वाटलंच होतं...

मीना : मला नोकरी नको

भडकमकर : काय म्हणतीस ?

मीना : मी मूर्खपणा करतेय्, असं सांगणार तुम्ही मला.

भडकमकर : नाही. शहाणपणा करतेय्स पण हा शहाणपणा सगळ्यांना परवडणारा नसतो. काय ? खरंय्, की नाही ?

मीना : मलाही परवडत नाही पण जन्मभर मनाची टोचणी नकोय् मला.

भडकमकर : बरं वाटलं ऐकून. नाहीतर आजकाल कुठली मुलगी मनाची पर्वा करते !

मीना : मुलींचा काय दोष ? तुमच्यासारखे पुरुष जागोजाग सापळे लावून ठेवतात. इथं ना तिथं सापडायला होणारच.

भडकमकर : थांब. प्लीज स्पेअर मी. पुढचं सगळं व्याख्यान पाठ आहे मला. कित्येकजणींकडून ऐकलंय् मी ते.

मीना : आणि तरीदेखील असं वागण्यात तुम्हांला आनंद वाटतो ?

भडकमकर : आनंद वाटतो, असं नाही. पण नड भागते. शेजारच्या खोलीत माझी बायको झोपल्येय्. लग्नानंतर जेमतेम अडीच वर्षं संसार केला असेल आम्ही. त्यानंतर अर्धांगवायूचा झटका येऊन तिचं शरीर कायमचं लुळं पडलं !

मीना : काय सांगता ?

भडकमकर : धंदेवाईक बायकांकडे जायला मन घेत नाही. आपल्याच थरातली बाई भेटावी, असं वाटतं–यात काय चूक आहे ? खरं, की नाही ?

[ मीना पुन्हा पहिल्या प्रकाशवर्तुळात बसलेली. समोर टेबलामागे भडकमकर. आता त्यांच्या बोलण्यातला खोटा गोडवा जाऊन पद्धत पूर्ववत झालेली. ]

भडकमकर ' काय, खरं, की नाही ? ( सरळपणे ) सगळीकडे हेच असतं...सांगितलेली कामं ऐकावीच लागतात. त्यातनं तुम्ही मॅरीड, म्हणून कामामध्ये सवलती देऊ...तुम्ही काहीच बोलत नाही, मिसेस् कानविंदे. कसला विचार करताय् ?

मीना : ( शुद्धीवर आल्याप्रमाणे ) तुमच्या मिसेस् आजारी—

भडकमकर : बिलकुल नाही. शी इज अ पिक्चर ऑफ हेल्थ. वुई आर् अ व्हेरी हॅपिली मॅरिड कपल्. घरी या एकदा.

मीना : घरी !

भडकमकर : केव्हाही या, तुमच्या सवडीनं–किंवा रादर मिस्टर कानविंद्यांच्या सोयीनं. पण तुम्ही असं का विचारलंत मध्येच !

मीना : नाही, माझ्या एकदम डोक्यात आलं...

भडकमकर : ओ आय् सी ! हे बघा, इथं काम करायचं, तर पहिल्यांदा ती भीती काढून टाका डोक्यातून. या ऑफिसात माझ्यापासून किंवा इतर कुठल्याच पुरुषापासून तसा काही धोका नाही तुम्हाला !

मीना : माफ करा. मला काहीतरीच वाटलं....

भडकमकर : पर्फेक्टली ऑल राईट. बाईच्या जातीनं नेहमी सावध राहायला हवं.

मीना : पण असं काहीतरी एका क्षणात माझ्या डोक्यात येऊन गेलं– इतकं विचित्र...

भडकमकर : मराठी नाटकं फार पाहता वाटतं ? –धंदेवाईक नाटकं ? त्यात दाखवतात असं ! म्हणजे बॉस जसा काही दुष्ट लांडगा आणि परिस्थितीपार्यी नायिकेच्या शीलाचा विक्रय वगैरे ! फर्गेट इट् ! अहो, इथं कामामधून वेळ आहे कुणाला भानगडी करायला ? आणि जो तो भानगडी करीत बसला असता, तर एक ऑफिस धड चाललं नसतं. काय, खरंयू, की नाही ?

मीना : ( हायसं वाटून ) एकदम खरं.

भडकमकर : मग उद्यापासून या तुम्ही कामावर.

मीना : ( आश्चर्यानं ) उद्यापासून ? ( भारावून ) थँक्यू व्हेरी मच. उपकार झाले तुमचे.

भडकमकर : कसले उपकार ? अहो, तुमच्यासारख्या पोरीबाळींना नोकऱ्यांवर धडपड-ताना पाहायचं म्हणजे मनाला त्रास होतो, हो ! पण काय करणार ? दिवस कठीण आलेत. आपल्याकडून होईल तेवढी मदत करायची !

मीना : ( विलक्षण आनंदानं ) मला नोकरी मिळाली ? हे खरंच नाही वाटत !

हे काही खरं नाही....हे काही खरं नाही
ही नवलाई– ही अपूर्वाई
घडली कशी बाई
हे काही खरं नाही...हे काही खरं नाही

[ सगळा जनसमूह जमा होतो, आणि त्यातून मीना भिंगरीसारखी फिरत राहते...]

मीना : जीव विसरून गेला
होता अशा आनंदाला
पाऊलही न वाजू देता
तोच अचानक आला
कुठं ठेवू आता याला
कुठं नको असं होई
हे काही खरं नाही...हे काही खरं नाही

लता : ( धावत येऊन ), अय्या, वहिनी—!

मीना : वन्सं, वन्सं, मला नोकरी मिळाली... आई... मला नोकरी मिळाली— ( नमस्कार करते. )

आई : अग, माझ्या कशाला ? आधी देवाच्या पाया पड...

मीना : ( चकित होऊन ) आई, तुम्ही माझ्याशी बोलायला लागलात...!

आई : ( एकदम मीनाला मिठी मारून, ओक्साबोक्सी रडत ) मनावर धोंडा ठेवला होता, ग, पोरी, इतके दिवस ! त्यातनं माझ्यासारखी बडबडणारी बाई— बोलायला माणूस लागतं. कधी हा अबोला संपेलसं झालं होतं— आता किती दिवस घरी आहेस ?

मीना : उद्यापासून बोलावलंय् कामावर.

आई : उद्यापास्नं ? अरे देवा ! अग, मेलं ते भांड्यांचं काम काढून ठेवलं होतं तुझ्या जिवावर—आता ते कोण निस्तरणार ? जळ्ली मेली ती नोकरी नेमकी उद्यापास्नंच सुरू ! माधव, बघ, बाबा—

माधव-मीना : गच्च दाटलेलं नभ
हवा उदास झालेली
आज अवचित सारी
अभ्रं वितळून गेली
लख्ख झळाळून आलं
सुख माझ्या देही
हे काही खरं नाही ... हे काही खरं नाही ...

[ पडदा ]

ग्र. सं. आवक. २८।५।८०
वा. २३५०२
वि. २४६

# अंक तिसरा

[ माधवची आई निवडीत बसलेली. करपेमास्तर येतात. ]

करपे : माधवच्या आई, सुनेला नोकरी मिळाली ! आता तरी गेला, की नाही माझ्यावरचा राग ?

आई : तुमचे बाकी उपकार झाले, हो, मास्तर ! नाहीतर फार त्रास काढला पोरीनं नोकरी शोधण्यासाठी. मला कल्पना सुद्धा नव्हती आजकाल एवढं कठीण झालं असेल, याची. आमच्या वेळी बघा, मुलगी फायनल असली न् जरा चुणचुणीत असली, की मास्तरणीची नोकरी चालत यायची.

करपे : तुमच्या वेळचं काय राहिलंय् आता, माधवच्या आई !

आई : आता, मास्तर, लताच्या लग्नाचं तेवढं बघावं लागेल. मग नाही तुम्हांला त्रास देणार !

करपे : नाव नको लताच्या लग्नाचं. माधवच्या लग्नात मिळाल्या, तेवढ्या शिव्या पुष्कळ झाल्या !

आई : ते काय अजून धरून बसलाय् ? कमाल आहे तुमची. तुम्हांला ठाऊकेय्, माझी जीभ आहे फटकळ ! विषय निघाला, तर अजून शिव्या देईन. म्हणून तुम्ही मनावर घ्यायच्या, की काय त्या ?

करपे : तसा आज देखील आलोय्, ते आणखी शिव्या खाण्याच्याच तयारीनं. म्हणजे तुम्ही म्हणणार, सुनेला नोकरी लावून दिली, आता घरातलं सगळं काम पडलं माझ्यावर. निवडणं टिपणं करायला सुद्धा सून घरात नाही !

आई : मास्तर, तुम्ही काय आम्हां दोघींच्यांत भांडण लावायला आलाय् ? ( करपे हसतो. ) का सासू म्हंजे एकसारखी सुनेची निंदाच करणारेय् ? तुम्हांला सांगते, मास्तर, माझी सून नोकरी करूनसुद्धा घरच्या कामाला डरत नाही, हो ! रात्रीचं जेवणसुद्धा तीच करते. इतकी थकून आल्या-नंतर देखील ! नको म्हटलं, तरी ऐकत नाही, मग मीसुद्धा जास्तीच्या पोळ्या सकाळीच करून ठेवते. म्हणजे नुसता भात टाकला, की होतं काम !

[ मीना येते. ]

आई : आलीस ? बसा, मास्तर. चहा ठेवते. सगळ्यांनाच होईल.
मीना : तुम्ही बसा, आई. मी करते चहा.
आई : अग, तू घे हातपाय धुऊन ! साडी बदल. तोवर चहा होईल. (जाते.)
मीना : मास्तर, कुठली पुण्याई म्हणून मला अशी सासू मिळाली ?
करपे : वा, ग, पुण्याई तुझी ! म्हणजे मी लग्न जमवलं, त्याचं क्रेडिट काहीच नाही, वाटतं ?
मीना : तुमचे उपकार तर या जन्मात फिटायचे नाहीत, मास्तर! तुम्ही होता, म्हणून आज मी सुखात आहे! नाहीतर ऐकते ना ऑफिसात एकेकीचं——

[ तिघी जणी येतात. दुपारचे जेवणाचे डबे खात बसतात. ]

पहिली : केव्हा सोडीन, अस्सं झालंय्....जळ्ळी मेली ही नोकरी !
उजाडायच्या आधी उठते
पाणी भरते, सफाई करते
जेवण रांधून टिफीन भरते
कश्शीबश्शी लोकल गाठते
संध्याकाळी गेल्यानंतर
कामं आहेतच समोर हजर
त्यातून यांचा स्वभाव हौशी
रात्री सुटका होईल कशी !
( तिघीही हसतात. )
माझ्या भाळी लिहिलीय् अश्शी कायम सक्तमजुरी
केव्हा सोडीन, अस्सं झालंय्...जळ्ळी मेली ही नोकरी !

दुसरी : छोकरा माझा जातो शाळेत
शिकतो आता वरच्या यत्तेत
त्याचा अभ्यास मागं पडतोय्
संगतीपायी वाया जातोय्
घोर लागलाय् कुणाबरोबर फिरते माझी छोकरी
केव्हा सोडीन, अस्सं झालंय्...जळ्ळी मेली ही नोकरी !

तिसरी : सासू म्हणते झालंय् वय
तुम्हीच तुमची बघावी सोय
सगळी कामं बरी करीन
मी आहे का मोलकरीण ?
उकिरड्याची कळा घराला आली आहे खरी
केव्हा सोडीन, अस्सं झालंय् जळ्ळी मेली ही नोकरी !

मीना : खरंच, ग बाई, फार त्रास पडतो तुम्हांला. मला तसं काही नाही. कारण आईपेक्षा अधिक करणारी सासू आहे आणि अजून तरी मुलाबाळांचा त्रास नाही ! पुढं कठीण झालं, की सोडीनसुद्धा नोकरी.

[ तिघीही हसतात...खदखदून. ]

पहिली : नाही, ग, बाई ! एकदा नोकरी करायला लागलं, की ती कध्धीच सोडता येत नाही.

दुसरी : त्या सिंदबादच्या म्हाताऱ्यासारखी बघ, नोकरी आपल्या मानगुटीलाच बसते आणि मग पुढं त्या मगरमिठीचीच सवय होते !

तिसरी : आपण अडचणीतनं नोकरी करतो पैशासाठी. पुढं पैसा आल्यावर वाटतं, इतक्या अडचणींतनं निभावलं, आता कशाला नोकरी सोडा ?

तिघी : उतू नको मातू नको
घेतला वसा टाकू नको
महिन्याकाठी पैसा देते
अश्शी नोकरी सोडू नको
आज उद्याला सोडीन म्हणता सरली उमर ही सारी
केव्हा सोडीन, अस्सं झालंय्....जळ्ळी मेली ही नोकरी !

मीना : खरंच– कधीकधी वाटतं, की नोकरी धरली, ही चूक तर नाही झाली ? संसार सुखाचा व्हावा, म्हणून नोकरी करायची, पण कसला संसार म्हणायचा तो ? रात्री भेट होते, तेव्हा चार शब्द बोलण्याइतकी काही शक्ती राहत नाही– मला– आत्तासुद्धा...

पहिली : कानविंदे, अग, काय झालं ?

मीना : मला चक्करतंय्...

[ ती पडणार, एवढ्यात त्या सावरतात. वारा घालतात. पाणी देतात.

हळूहळू मीना शुद्धीवर येते. ]

पहिली : बरं वाटलं ?
मीना : हूं...
दुसरी : घरी जातेस ?
मीना : नको...
दुसरी : चल–चल–मी येते हवी तर सोबत. तेवढंच मला लौकर निघायला निमित्त...

[ तिला घरी घेऊन येतात. ]

माधव : असं पुन्हा कधी करू नकोस. चक्कर आली, तर निदान मला फोन करायचास !
मीना : झालं ! म्हणजे तुम्ही धावत माझ्या ऑफिसात आला असता–उद्या सगळ्या जणींनी चिडवून खाल्लं असतं मला...
माधव : त्यांचं काय जातंय् चिडवायला ? बायकोच्या तब्येतीची काळजी नवऱ्यानं नाही तर कुणी करायची ?
मीना : ( हसत ) अहो, त्यांनाही नवरे आहेत !

[ दोघं फिरत फिरत वाळूत येऊन बसलेली. ]

माधव : किती अशक्त होत चाललीयस. झेपत नसेल, तर सोड बरं नोकरी.
मीना : कशी सोडू ? परवाच तर म्हणत होता, की अजून सहा महिने तरी देणी संपायची नाहीत.
माधव : तू काय मला निर्दय राक्षस समजलीस ? घरात पैसा यावा, म्हणून मी तुझा बळी देईन ?
मीना : ( हसून ) इतकं काही अगदी नाटकातल्यासारखं बोलायला नको. घर काय तुमचं एकट्याचंच आहे ! माझ्याच घरासाठी नोकरी करतेय् मी !
माधव : अग, पण आजारी पडलीस, तर सोडावीच लागेल ना ती ? त्यापेक्षा तेवढी वेळ येण्याआधीच सोडलेली बरी. तू नको करू पैशाची काळजी. मी बघेन कुठंतरी पार्टटाईम काहीतरी !
मीना : खरं सांगू ? मी पैशाची काळजी करीत नाहीये. तब्येतीचीही नाही. दुसरीच कसलीतरी...

माधव : कसली ?

मीना : आपण काय ठरवलं होतं? सगळं नीट लागेपर्यंत दोनतीन वर्षं तरी मूल नको असं....

माधव : बाप, रे...

मीना : तसं काही असेल, याची भीती.

माधव : पण आपण काळजी घेतोय् ना ?

मीना : एखाद्या वेळी काहीतरी चूक झाली असेल...

माधव : उद्या डॉक्टरकडे जाऊ या आपण.

मीना : एवढे घाबरून काय गेलात एकदम ? नसेलही तसं काही–

माधव : नाही. घाबरून नाही गेलो. पण एवढ्यातच हे होऊन कसं चालेल? सगळं बजेट अपसेट होईल. नाही. एवढ्यात मूल होऊन चालायचं नाही.

[ माधवचा मूड भलताच विषण्ण. हिंदी चित्रपटातला नायक रात्री एकटाच जीव द्यायला निघावा, तसा. प्रकाशयोजनाही तशीच गूढ, सिनिस्टर ! ]

माधव : त्याला काय करणार ?
आज ना उद्या याची चर्चा नक्की होणार
ऑफिसात नि रस्त्यात ज्याला त्याला कळणार
घडणारं ते घडणारच; ते कसं टळणार ?
त्याला काय करणार ?

[ एखाद्या कटातले मारेकरी जसे हळूहळू जमा व्हावेत, तशी माधवच्या ऑफिसातली माणसं गोळा होतात. एकमेकांत कुजबुजतात. ]

ऑ. मंडळी : असं कसं झालं ? असं कसं झालं ?
कानविंद्यांचं कळलं, का, हो, कळलं ?
एवढं काय घडलं, काय, हो, घडलं ?
प्लॅनिंग करतो म्हणता म्हणता सगळं बोंबललं–
यांचं प्लॅनिंग बोंबललं—
असं कसं झालं ? असं कसं झालं ?

खर्चाची नाही तयारी
आणि करीत होता हुशारी
आता एकदा मूल झालं,
की भर म्हणावं बिलं
बिलं बिलं बिलं—
हे बरं झालं—हे छान झालं !

एक समंजस : नसते वाद घालून, सांगा, कुणाचं झालंय् भलं ?
अभिनंदन करू सारे
त्याचं, विसरून झालं गेलं.

सगळे : हे बरं झालं, हे छान झालं !
अभिनंदन, कानविंदे, तुम्ही भलतीच मारलीत उडी !

माधव : थँक्यू एव्हरीबडी—थँक्यू थँक्यू एव्हरीबडी.

एकजण : असा कोरडा थँक्यू नको, बोला, पार्टी कधी देणार ?

माधव : देणार, देणार, देणार !

सगळे : आम्ही घेणार, घेणार, घेणार !

[ एकजण बिल आणून देतो. ]

माधव : हे काय ?

एकजण : बिल—पार्टीचं !

सगळे : बिलं बिलं बिलं—बिलं बिलं बिलं

माधव : यांची पार्टी होते, होतो आमचा खिसा रिकामा
अहो, भिडस्त पडलो आम्ही—
हे करतात आमचा मामा
आम्ही देणार—ते घेणार, त्याला काय करणार ?
त्याला काय करणार ?

[ डॉक्टर येतात. ]

डॉक्टर : मिस्टर कानविंदे, आय् वॉर्न यू—मिसेस् कानविंद्यांनी श्रम अजिबात करता कामा नये. त्यांची सगळी सिस्टीमच इतकी नाजूक आहे, की गर्भ वाढायला हवा असेल, तर त्यासाठी फार काळजी घ्यायला हवी. इतर बायकांची गोष्ट वेगळी. पण निदान यांच्या बाबतीत तरी—सगळे श्रम

एकदम बंद !

माधव : लग्नाची देणी थकली
तेवढ्यात खर्च मुलाचा
त्यावरती कडी कराया
वीकनेस् हिचा यायाचा

डॉक्टर : माझं ऐका, कानविंदे, तुम्ही बायकोला नोकरीवरून वर्षभर रजा घ्यायला सांगा. ते शक्य नसलं, तर नोकरी सोडायला सांगा. नाहीतर काय होईल, याची गॅरंटी मला देता येणार नाही.

माधव : ज्यासाठी करिती कोणी
उपचार, नवससायास
लाभले अम्हां ते देणे
केल्याविण काही प्रयास
पण आम्हांला त्याचं काही वाटतंय् का ?
साक्षात बाप होणार
याचा ना मोद मनाला
नोकरी, खर्च, इत्यादी
पोटात आणती गोळा
साले, आम्ही कर्मदरिद्रीच !

मीना : रागावलात माझ्यावर ?

माधव : नाही, ग ! रागावेन कशाला ? तुझी तब्येत नाजूक आहे, हा काय तुझा अपराध ?

मीना : माझा नाहीतर कुणाचा ?

माधव : जाऊ दे. यातूनही काहीतरी मार्ग निघेल.

मीना : कसला मार्ग ? डॉक्टर म्हणतात, तशी वर्षभर रजा मिळणं शक्यच नाही. मॅटर्निटी लीव्हसुद्धा अजून सहा महिन्यांनी मिळेल. तोवर माझ्या क्रेडिटला एक दिवसाचीही रजा नाही.

माधव : भडकमकर इतकं चांगलं वागतात, म्हणतेस. ते नाही का काही करू शकणार ?

मीना : ते काय करणार ? शक्य तेवढं संभाळून घेतात. संध्याकाळी काम राहिलं, तरी लौकर घरी जाऊ देतात. कधी ऑफिसात उशिरा गेलं, तरी बोलत नाहीत. पण रजेचे नियम ते कसे बदलणार ? डॉक्टरांचं ऐकायचं,

म्हणजे राजीनामाच द्यायला हवा.

माधव : मग? देतेस?

मीना : कशी देऊ? इतक्या प्रयासानं मिळालीय् ही नोकरी. नशीब तरी कसं बघा—नोकरी मिळाली, तर हे!

माधव : असं काय म्हणतेस? खरं तर, पहिलं मूल म्हणजे आपल्याला किती आनंद व्हायला हवा!

मीना : नोकरी मिळाली, ही सुद्धा आनंदाचीच गोष्ट! पण दोन आनंदाच्या गोष्टींनी जसा काही एकमेकींना छेद दिलाय्. आणि आपण आपले काळजीत ते काळजीतच!

माधव : मला एक उपाय ठाऊकेय्. पण सांगितला, तर रागावशील.

मीना : सांगा तरी.

माधव : बघ हं—मग मला नावं ठेवायची नाहीत. कारण खरं म्हणजे हा उपाय मला सुचलेला नाहीच. ऑफिसातल्या एका मित्रानं सांगितलाय्. तो—म्हणाला, भरवशाचा डॉक्टर आहे एक. चापनेरकर म्हणून!—तो लगेच मोकळं करून देईल! (मीनाला चिठी दाखवीत) ही चिठी. त्या मित्रानंच दिलीये. चापनेरकरांसाठी. मग जायचं ना त्यांच्याकडे?

मीना : दुसरा मार्गच नसला, तर....

माधव : नोकरी सोडणं हा एक मार्ग आहे.

मीना : ते शक्यच नाही. पण हा चापनेरकर खात्रीचा आहे ना?

माधव : त्याची काळजी नको. भलताच फेमस आहे तो यासाठी.

मीना : (जिवावर येऊन) तुम्हांला काय वाटतं? तुम्ही सांगाल, ते ऐकेन मी.

माधव : मला वाटतं, हाच मार्ग सगळ्यांत सोपा आहे.

मीना : मग माझी तयारी आहे.

माधव : शाब्बास.

मीना : पण . पण ते काय असेल, हो? मुलगा, की मुलगी?

माधव : आता एकदा ठरवलंयूस ना तू? मग हवेत कशाला हे विचार?

मीना : बरोबर आहे तुमचं. आता आपण तो विचार देखील डोक्यातनं काढून टाकायला हवा!

झाकोळून गेले नभ
उदासला वारा
नको एवढ्यात, चंद्रा

उगवू, रे, थांब जरा

निळ्या स्वागताला सज्ज
तुला हवे ना आभाळ
जरा बांधू दे रात्रीला
पायी चांदण्यांचे चाळ

बघ निरोप घेऊन
तेव्हा उधळेल वारा
तोवरी नको येऊ
चंद्रा, थांब थांब जरा

[ लता आणि आई. ]

लता : ( कावरीबावरी ) आई....
आई : काय झालं, ग ?
लता : मला भीती वाटते, ग, आई...
आई : असं काय करतेस, लता ? अग, कसली भीती ? बोल ना–( लता रडू लागते. ) रडू नकोस. नीट सांग बरं, काय झालं, ते....
लता : आई, वहिनीची तब्येत...
आई : म्हंजे तसलं काही आहे, की काय ? ( लता मान डोलावते. ) अग, पण त्या दिवशी तर दोघं म्हणत होती, की अजून तीन वर्षं तरी मूल व्हायचं नाही...
लता : व्हायचं नाही, म्हणजे— ( एकदम हुंदका देऊन ) आता नाहीच व्हायचं !
आई : म्हणजे, ग ?
लता : आमच्या वर्गातली दळवी आहे ना–तिच्या घरासमोरच चापनेरकर डॉक्टरांचा दवाखाना आहे. ते डॉक्टर, मूल नको असलं, तर–( हुंदका देते. )
आई : काय, सांगतेस काय !
लता : देवाशपथ–दळवी सांगत होती, की तिनं काल दादा न् वहिनीला त्या डॉक्टरांकडे जाताना....
आई : अरे कर्मा ! अग, असली भयंकर गोष्ट करतील तरी कशी ती ? माणसं आहेत, की आहेत कोण ? आता येऊ देत दोघं, म्हंजे विचारते...

[ माधव आणि मीना येतात. ]

आई : ( ओरडून ) दारातच थांबा. आत येऊ नका.
माधव : काय झालं, आई ?
आई : घरात पाऊल टाकू नका.
माधव : अग, पण, आई...
आई : मी न् लता जातो या घरातनं, मगच पाऊल टाका.
माधव : पण, आई, झालं काय असं डोक्यात राख घालायला ?
आई : माणसं हवीयत कुठं तुम्हांला ? उद्या आमच्यावर खर्च होतो, म्हणून आमचा खून करायला मागं-पुढं पाहणार नाही तुम्ही.
मीना : ( अजीजीनं ) आई, आत तर येऊ द्या. चाळीतली लोकं बघायला लागलीयत.
आई : या.

[ ती दोघं घरात येतात. ]

आई : पण मी मात्र आता तुमच्यासारख्या खुनी माणसांबरोबर इथं राहून पाणीसुद्धा प्यायची नाही.
माधव : कुणी खून केला, आई ? कुणाचा ?
आई : तुम्ही दोघं. त्या अजून जन्माला न आलेल्या पोराचा प्राण घेताय्. स्वतःच्या पोराचा ! राक्षस ! राक्षस आहात दोघं. तुम्हांला वाटलं, की लपवून ठेवलं, म्हंजे मला काही कळत नाही.
माधव : अग, पण, आई....
आई : कशाला करताय् त्या नोकऱ्या ? कुणाच्या मढ्यावर घालणार आहात तो पैसा ? एका तान्ह्या बाळाचा खर्च तुम्हांला झेपत नाही ? त्यासाठी तीन–तीन वर्षं थांबावं लागतं ! त्या येऊ येऊ म्हणणाऱ्या अर्भकाच्या नरडीला नख लावावं लागतं ! अरे, आम्ही पीठ आहे, तर मीठ नाही, असल्या परिस्थितीत तुम्हांला जन्म दिला न् वाढवलं, ते आम्हांला नसतं तुम्हांला ठार मारून टाकता आलं ? तेव्हाच केलं असतं ते, तर आज हा दिवस तरी बघावा लागला नसता ! आणि तू , ग ? हा एक वेळ पुरुष-माणूस–याच्या पोटात माया नाही ! पण तू ? तू त्या पोराची आई होणार–आणि आज त्याला मारून टाकायला निघालीस ?
माधव : पैशासाठी नाही करीत आम्ही हे, आई, पण हिला नोकरी सांभाळून मुलाला...

आई : बाकीच्या बायका नोकऱ्या सांभाळूनच वाढवतात ना मुलांना ? की सगळ्यांनी आपली मुलं मारून टाकली ? आणि हिला कशाला सांभाळावं लागणारेय् मूल ? मी आहे ना एवढी धडधाकट ? एक मूल सांभाळायला होत नसेल, तर माझा मेलीचा उपयोग काय ? पण तुम्ही जर कुणाला काही न विचारता, न सांगता...

माधव : तसं नाहीये, आई. हिला डॉक्टरनी सांगितलंय् , की मूल व्हायला हवं असेल, तर नोकरीचे श्रम झेपायचे नाहीत.

आई : म्हणून तुम्ही त्या बापड्या पोराच्या जिवावर उठलात ? अरे, हे पाप आहे, पाप ! असली पापं करून कधी वंश वाढायचा नाही. मेल्यांनो, मी हजार वेळा मनाशी म्हणतेय् , की माझं नातवंड कसं असेल, मी त्याला कशी न्हाऊमाखू घालीन—कशी लाडानं वाढवीन—कसं मोठं करीन आणि तुम्ही माझ्या नकळत—माझी सगळी स्वप्नं—मातीत गाडायला निघालात ! ( ओक्साबोक्शी रडू लागते. )

मीना : ( स्वतःचं रडू आवरून ) रडू नका, आई—आमचं चुकलं—आम्ही विचार केला, तो फक्त आमच्या संसाराचा. पण हा संसार तुमचासुद्धा आहे, हे लक्षातच घेतलं नाही आम्ही. शांत व्हा. तुमच्या मनासारखंच होईल.

माधव : मीना !

मीना : उद्या बोलावलं होतं डॉक्टरनी. पण मी जाणार नाही, आई. तुम्हांला नातवंड मिळेल. ( थांबून ) माझं चुकलं, आई. मी आई होणार असून, विचार केला नाही आईसारखा—

आई : ( हसत—रडत ) तू काही काळजी करू नकोस, सूनबाई. सगळं ठीक होईल. मी आहे ना ! चांगले मजबूत अळिवाचे लाडू करून घालते बघ तुला. काही घाबरू नकोस बाळंतपणाला ! असली खूप बाळंतपणं पाह्यलीत मी. मग तो डॉक्टर काहीही सांगू दे !

मीना : खरंच, आई—तुम्ही बोललात नि हायसं वाटलं. मी ठरवलं होतं—तेसुद्धा मनाविरुद्धच ! आता एकदम उजाडल्यासारखं वाटतंय् .

[ निवेदक येतो. ]

निवेदक : म्हणजे सगळं जैसे थे राहिलं. मागून पुढं चालायला लागलं. माधव—मीनानं ॲबॉर्शन न करण्याचा निर्णय घेतला. काहीतरी नाही करायचं, असं आपण ठरवलं, की प्रश्न उगाच सुटल्यासारखा वाटतो, आणि जिवाला उगाचच थोडं मोकळं मोकळं वाटतं.

अजून तरी कुठलाच प्रश्न नव्हता सुटलेला
तरी त्यांचा जीव पार सुखावून गेला !
केवढा असतो मनावरती अडचणीचा भार
वाटतं, केव्हा एकदा होईल ती मार्गातून दूर
बरेच दिवस अडचण तशीच, आपणही तिथेच
होताहोता सवय होते, वाटते अडचण हवीच
अडथळाच मग होतो रस्ता, वाटत नाही त्रास
नाही तरी कुणा लेकाला करायचा असतो प्रवास ?
अधिक धडपड कशासाठी, राहू जमेल त्यात
आम्ही छोटी छोटी माणसं फिरतो या वर्तुळात—
आमच्या छोट्या वर्तुळात !
आम्ही फिरतो वर्तुळात !

[ मीनाच्या ऑफिसमधल्या मुली येऊन तिला घेरतात.
मीना अतिशय सुखावलेली. ]

मीना : चंद्र यायचा आभाळी त्याचं चांदणं सांडलं
पूर्वदिशेवर साऱ्या पाणी तेजाचं चढलं

सगळ्या : ( तिच्याभोवती फेर धरून )
पहिल्या मासी मासुळा–रंग झाला पिवळा
पिंड घडे, ग, सावळा–जू बाळा जू जू

मीना : गेलं भरून आभाळ या, ग, वर्खानं चंदेरी
दगादगांना लाभल्या आणि रुपेरी किनारी

सगळ्या : दुसऱ्या मासी पदर बंद, हिरव्या चोळीवर चांद
आईबापांना आनंद– जू बाळा जू जू

मीना : पाणी सागराचं झालं चंद्रा भेटाया आतुर
लाटा उसळल्या आला त्याच्या मायेलागी पूर

सगळ्या : चवथ्या मासी कुसवा चढं अन्न लागेनासं गोड
पिवळ्या पानाचं, ग, विडं, जू बाळा जू जू

मीना : झाल्या नारळी सावध सज्ज त्याच्या स्वागताला
त्याच्या वाटेला लावून डोळे किनारा बैसला

सगळ्या : सहाव्या मासी सायास अतीचोळीसाडी इच्छापुरती
पुत्र मागुनीया घेती–जू बाळा जू जू

मीना : रात्र म्हणे उरी लक्ष नक्षत्र दिवे पेटले
कधी येशील, रे चंद्रा, मन वाटुली बनले

सगळ्या : ओटी भरा, ग, ओटी भरा–तिची ओटी भरा
फुलांचा सारा शृंगार करा
वाट्या खिरीनं दोन्ही भरा
एकीत अंगठी, एकीत रुपया
मुलगा, की मुलगी, हे विचारा
( सगळ्या हसतात. )
झोक्यावरचं ? मग नावेमधलं ?
तळ्याकाठी, की बागेतलं ?
नको ? बरं, बरं, मग हपिसातलं
साहेबाच्या खुर्चीला मखर करा
बढतीची इच्छा पुरी करा
मुलगा झाला, तर होईल कलेक्टर
मुलगी झाली, तर श्रीमंत सासर
इच्छा तिची सारी पुरी करा
ओटी भरा, ग, ओटी भरा
खणानारळानं ओटी भरा
हळदी कुंकवानं ओटी भरा
पिवळ्या हळदीनं ओटी भरा
तांबड्या कुकवानं ओटी भरा
लाल लाल कुंकवानं ओटी भरा
लाल लाल कुकवानं ओटी भरा—

[ सगळीकडे तांबडालाल प्रकाश पसरलेला. ओटी भरण्याचा कार्यक्रम अधिकाधिक भयानक होत गेलेला.
मुलींचा फेर थांबतो, तेव्हा मध्यभागी, अस्ताव्यस्त पडलेली मीना.
धावतच येणाऱ्या माधवला डॉक्टर भेटलेले. ]

डॉक्टर : आय ॲम सॉरी टु टेल यू, मिस्टर कानविंदे, शी हॅज लॉस्ट द चाइल्ड. मूल तर गेलंच; पण मिसेस् कानविंद्यांची तब्येतही चिंताजनक आहे.
माधव : डॉक्टर !
डॉक्टर : मी आधीच सांगितलं होतं तुम्हांला. त्यांना संपूर्ण विश्रांतीची गरज

होती. त्याशिवाय गर्भ राहूच शकत नव्हता. पण तुम्ही माझं ऐकलं नाहीत. मिसेस् कानविंदे नोकरीवर जातच राहिल्या. मग दुसरं काय होणार ?

माधव : सॉरी, डॉक्टर. पण कसंही करून मीनाला वाचवा.

डॉक्टर : शर्थीचे प्रयत्न करतोय् त्यासाठी. पण माझ्या हातांत फारसं काही नाही.

[ मीनाच्या बिछान्याशी माधव, शिरधनकर, करपे, आणि मीनाची एक मैत्रीण असे उभे. मीनाला सलाइन दिलं जात आहे. कुणीही बोलत नाही. फक्त घड्याळाची टिकटिक ऐकू येते.
मग, एकाएकी, दुसऱ्या बाजूला माधवच्या आईचा हंबरडा. तिचं सांत्वन करणारी लता. ]

आई : परमेश्वरा, वाचव रे पोरीला. हवं तर मला म्हातारीला घेऊन जा. खूप पाहिले जगातले सोहळे, आता काही इच्छा उरली नाही. तिचं अजून सगळं व्हायचंय्. तिला वाचव, रे बाबा मल्हारी...पोरीला वाचव. गावी येऊन जोडीनं पूजा बांधतील तुझी.

[ करपे येतात. ]

आई : मास्तर, बघा हो, काय झालं, ते ! डॉक्टर म्हणतात; पोरीची आशा नाही. जळली मेली ती नोकरी ! या नोकरीपायी, पोरीचे माझ्या, हालहाल झाले ! बघा, हो, हे झालं, ते देखील तिथंच बाहेर दहा लोकांमधे. तिथनंच हॉस्पिटलमध्ये पोचवली परस्पर. मला बघताही आलं नाही. सगळे म्हणतात, तू तिथं तमाशा करशील, येऊ नकोस हॉस्पिटलात !

[ शिरधनकर येतात. ]

आई : शिरधनकर, तुम्ही म्हणाल, आम्ही पोरीला कामाला जुंपली, तिचे हाल केले. म्हणा, तुम्हांला अधिकारच आहे तसं म्हणायचा. आम्हीच हट्ट धरला नोकरीचा. पण खरं सांगते, शिरधनकर, अगदी गणपतीची शपथ, यातनं एकदा निभावली ना पोर, की सांगणारेय् तिला, बस झाली तुझी नोकरी. स्वतःची तब्येत सांभाळलीस, म्हंजे खूप झालं.

शिरधनकर : शांत व्हा, आई, किती त्रास करून घेता स्वतःला ?

[ प्रकाशझोत पुन्हा दुसऱ्या बाजूला. मीनाच्या उशाशी बसलेला माधव.]

माधव : मीना–मी आहे–माधव...

मीना : ( संपूर्ण भ्रमात ) कोण आहे ? चिरपुटकर ? नको ग–लांब्या बाह्यांचे ब्लाऊझ मला बरे नाही दिसणार...सासूबाईना माझं नाव सांगशील ? अग, जा, ग ! त्या नाहीत तुझं ऐकणार. त्यांनी, किनई, घरच्या तुपाची वरणी ठेवलीय् फडताळात. रोज पानावर घरचं तूप वाढतात. मला एकटीला. ....लतावन्सं, तुमचं लग्न आपण खूप थाटात करू हं. वरातसुद्धा काढू. झालंच तर जुन्या फॅशनचे बाजूबंद असतात ना, ते करू दंडांत घालायला...

माधव : मीना....मीना, मला ओळखलंस ?

मीना : परत परत काय हाका मारताय, भाऊ ? मी नाही यायची माहेरी. माझी मायेची माणसं इथंच आहेत. या ऑफिसात !....आणि कितीतरी मुलींच्या डब्यात कोबीचीच भाजी असते. पण कोबी तरी काय स्वस्त मिळतो का या दिवसांत ?

माधव : मीना....जरा गप्प पडून राहा बरं.

मीना : पाणी....पाणी...

[ माधव तिला पाणी देतो. ती एकदम घाबरल्यासारखी होते. ]

मीना : अहो, अहो, मला भीती वाटते. ते लोक ओढून नेताहेत माझ्या बाळाला. मारताहेत फटक्यांनी. एवढ्याशा बाळाला ! ती बघा रक्ताची चिळकांडी उडाली–रक्तच रक्त ! मला भीती वाटते. कुणीतरी खोल खोल ढकलतंय्. ...अहो, तुम्ही कुठं आहात ? मला धरून ठेवा नं– ( किंचित शुद्धीवर येऊन ) अहो, तुम्ही आहात ना ? जाऊ नका हं मला सोडून !

माधव : नाही, मीना. मी कुठं जात नाही तुला सोडून !

मीना : खूप मोठं वादळ झालं, हो ! वाळूच वाळू उडाली. नारळीची झाडं गदागदा हल्ली ! आणि चंद्र एकदम मावळला, हो ! चंद्र एकदम मावळला.. ( रडू लागते. )

माधव : ( घाबरून ) मीना....मीना, मला सोडून जाऊ नकोस. मीना, तू मला हवीयस्. मीना....

[ निवेदक येतो. ]

निवेदक : डॉक्टरांना मीनाची पाच टक्केसुद्धा आशा वाटत नव्हती. आई देवाला साकडं घालून घालून थकल्या. लताचे डोळे रडून रडून सुजले. बापडा माधव, त्याला तर काही सुचत नव्हतं– आईचं न ऐकता वेळीच अॅबॉर्शन करून घ्यायला हवं होतं, की डॉक्टरांचं ऐकून मीनानं रजा घ्यायला हवी होती ? पण आता चूक काय नि बरोबर काय, हे ठरवण्यात अर्थ काय होता ? प्रसंग तर कठीण आला होता !

[ डॉक्टर येतात. ]

डॉक्टर : डोन्ट वरी. प्रसंग टळला. ती आता शुद्धीवर आलीय्.

निवेदक : तुमचे उपकार झाले, डॉक्टर.

डॉक्टर : माझे कसले उपकार ? त्या पोरीचीच जगण्याची जिद्द चिवट. शरीर झगडत राहिलं मरणाशी. शेवटी जिंकली. अहो, कधी कधी वाटतं, की आपण सगळेच आजकाल जिवंत राहतो, ते केवळ जगण्याच्या इच्छेमुळं.

[ माधव येतो. ]

माधव : डॉक्टर, तुमचे आभार कसे मानायचे, तेच कळत नाही.

डॉक्टर : मिस्टर कानविंदे, आता तरी माझं ऐका. मागल्या वेळेसारखी चूक पुन्हा होऊ देऊ नका. वर्ष, दोन वर्षं मधे जाऊ द्यात. पण पुन्हा राहिलेच दिवस, तर मात्र तिनं लगेच विश्रांती घ्यायला हवी. नाही तर गर्भ तोलण्याइतकी शक्ती नाही, म्हणून तो पुन्हा असाच पडून जाईल. त्यात तिच्या जिवाला धोका आहेच; पण शरीरालाही अशी सवय लागलेली चांगली नाही.

माधव : मी काळजी घेईन, डॉक्टर.

डॉक्टर : यू बेटर (जातात.)

माधव : मीना, आता बरं वाटतंय् ना ?

मीना : हो.

माधव : आता विचार करीत बसू नको. विश्रांती घे.

मीना : आपलं बाळ गेलं...गेलं नाही, हो ?

माधव : असं म्हणू नकोस, मीना. अजून त्याला कसला आकारसुद्धा नव्हता.

मीना : नसेल. पण त्याला समजत होतं. त्याला समजलं, की आपण कुणाला नको....( डोळे टिपते. )

माधव : असं काय म्हणतेस ?

मीना : नकोच होतं ते आपल्याला, म्हणून तर चापनेरकरांकडे जाणार होतो आपण. त्याला काढून टाकण्यासाठी! त्याला ते समजलं, म्हणूनच ते गेलं. आपणहून गेलं. (हलकेच रडू लागते.)

माधव : असं नको बोलू, मीना. त्या वेळी आपण वेगळ्या कारणासाठी...

मीना : कारण कुठलंही असेल. पण आपण त्याच्या मरणाची इच्छा धरली. म्हणून ते खरंच गेलं. आपण जसं काही आपल्या इच्छेनं त्याला मरणं भाग पाडलं. आपल्या इच्छेनंच त्याचा प्राण घेतला.

माधव : मी त्याचा विचार नाही करणार, मीना. तू जिवंत राहिलीस, यातच सारं काही भरून पावलं. मला दुसरं काही नको, मीना! मला फक्त तू हवीस.

मीना : असं आपण फक्त म्हणतो. पण प्रत्यक्षात आपल्याला नुसती प्रेमाची माणसं पुरत नाहीत. आणखी खूप लागतं, नाही का ?

- -

[ आई, लता, शिरधनकर आणि करपे मास्तर यांची बैठक जमलेली. माधवही येऊन त्यांच्यांत बसतो. मीना संथपणे येऊन दुसऱ्या बाजूला बसते. ]

आई : माधव, माझ्या मल्हारीनंच दाखवला, हो, हा दिवस. बरं का, रे, हिला जरा बरं वाटलं, की गावाला जा, आणि जोडीनं पाया पडा मल्हारीच्या. हिच्या आजारपणात मी बोलून चुकलेय्.

[ भडकमकर येतात. साहेब आले, म्हणून थोडी गडबड उडते. माधव त्यांना बसायला खुर्ची देतो. ]

भडकमकर : काय, मिसेस् कानविंदे, बरं आहे ना आता ? फार घाबरवून सोडलंत, म्हणे, सगळ्यांना.

मीना : (मंद हसून) बरं आहे आता. पहिल्या तारखेपासून येणारेय् ऑफिसात.

भडकमकर : डोन्ट वरी. तुमची रजा फुल पे होईल, असं बघतोय् मी.

मीना : थँक्स.

आई : साहेब, बोलले, तर राग मानू नका. मी अडाणी बाई. इतके दिवस मीच हट्ट धरला होता, हिनं नोकरी करावी, म्हणून. नोकरी लागेस्तंवर हिच्याशी बोलणं सुद्धा टाकलं होतं. पण, साहेब, आता वाटतं, हिनं सोडावी नोकरी!

ज्या मुलींना जमेल, त्यांनी करावी. पण हिचं पाहिलंत ना, काय झालं, ते ? अहो, इतकी जीव टाकून कशाला करायची नोकरी ?

भडकमकर : आई, बायकांना त्रास होतोच नोकरीचा. चालेल तितके दिवस चालवतात. मग अंगवळणी पडतं.

आई : मी म्हणते, चार चैनी कमी कराव्यात. थोडं अडचणीत राहावं. पण हे असलं काय कामाचं ? उगाच जिवाला घोर ! मी तर हिला सांगतेय् , की सोडच नोकरी. चांगली विश्रांती घे. नि खाऊनपिऊन धट्टीकट्टी हो !

भडकमकर : म्हणजे ? यांनी नोकरी सोडावी, म्हणता ?

माधव : माझी हरकत नाही तिनं नोकरी सोडायला.

लता : खरंच, वहिनी, सोड तू नोकरी. नोकरी करीत नसतीस, तर आपलं बाळ— ( तिच्यानं पुढं बोलवत नाही. )

माधव : मीना, आज ना उद्या हाही निर्णय आपण घ्यायलाच हवा.

[ काही क्षण शांतता. मग—]

मीना : मी—मी घेतलाय् निर्णय. मी नोकरी सोडणार नाही. कुठल्याही परिस्थितीत. घराकडे बघायला आई आहेत. ऑफिसात यांच्यासारखा समजूतदार बॉस आहे. ज्या मुलींना यातलं कुठलंच सुख नसतं, त्याही जिवापाड खपून नोकरी टिकवतात. मग मलाच का नाही ते जमणार ? नुसत्या चैनीसाठी नाही म्हणत, आई, पण खरंच अजून खूप करायचंय् घराचं. लतावन्संचं लग्न होईल. त्याच्यासाठी खूप पैसे साठवायचेत. खूप श्रीमंत मुलगा शोधू आपण त्यांच्यासाठी. डॉक्टर, इंजिनिअर—चिक्कार पैसे कमावणारा—वन्संना सुखात ठेवणारा ! म्हणजे त्यांना कधीच नोकरी करावी लागणार नाही. आमच्यासारखी दगदग सोसावी लागणार नाही— पण तेवढ्यासाठी तरी मला हवीच ना नोकरी करायला ?

[ निवेदक येतो. ]

निवेदक : मीनानं कुणाचं काही चालू दिलं नाही. पहिल्या तारखेला ती सरळ कामावर रुजू झाली. पूर्वीसारखीच आनंदात राहू लागली. आपल्यावर हे एवढं आभाळ कोसळलं होतं, हे कुणालाही जाणवू न देता.

[ मीना ऑफिसात जायला निघते. आई तिच्यामागून येते. ]

आई : आणि डब्यात तो मेथीचा लाडू दिलाय्, तो खाल्ल्याशिवाय राहू नकोस. कडू म्हणून खायची नाहीस, पण शक्ती भरून यायला चांगला असतो तो!

[ मीना मान डोलवून हसत हसत जाते.
सूत्रधार व इतर मंडळी येतात. ]

निवेदक : तर, सूत्रधार, सुरुवातीलाच मी काय सांगत होतो? गंधर्वसंगीत काही आम्हांला जमायचं नाही. अहो गंधर्वसंगीत म्हणणाऱ्या सिंधु, रुक्मिणी सुभद्रा, अशा थोरथोर नायिका आता राहिल्या आहेत कुठं—? आता उरल्या आहेत त्या फक्त चिमुकल्या चिमण्या.

सूत्रधार : चिमण्या?

निवेदक : तर, हो! चिमण्याच नाही तर काय? घरोघरी कोसळणारी आभाळं आपल्या अशक्त पंखांवर तोलून धरणाऱ्या चिमण्या—बाहेरची वारा—वादळं सोसून घरट्यासाठी काडी-काटकी जमा करणाऱ्या चिमण्या. आणि थकल्या भागल्या चिमण साथीदाराला सुख देऊन, त्याला, आपण गरुड आहोत, असं वाटायला लावणाऱ्या चिमण्या. आपण आता भरत-वाक्य म्हणायला हवं, ते या चिमण्यांसाठी.

[ निवेदक गाणं म्हणतो. त्यात प्रत्येक दोन ओळींनंतर सूत्रधाराची आलापी. भरतवाक्याच्या थाटाची. ]

ऐका हं, मंडळी.

इतुके संकट निवारले, पण कथा संपली नाही.
इथे संपली, तरी घरोघर फिरुनी घडतच राही

त्याचं काय आहे, मंडळी—

तुमच्या अमुच्या मधेच असतो एक निखारा जळता
चूल कुणाची पेटावी, यासाठी तो धगधगता
अतिक्षुद्र माणसे वाटते घराघरांतुन जगती
रणांगणे रोजची लढविण्या परी शूर ती होती
संकट येता प्राणपणाने ज्यांना ठावे लढणे
त्यांच्यासाठी गात राहावे तुमचे अमुचे गाणे
तुमचे अमुचे गाणे, तुमचे अमुचे गाणे

[ प ड दा ]

इतर कुठल्याही कलेप्रमाणे, नाटककलेतही अंतर्विरोध आहेत. प्रत्येक माध्यमाला स्वतःचे असे काही नियम असतात; परंतु त्या त्या माध्यमाशी संबंधित असलेली कला, ते नियम मोडून बंधमुक्त होण्याचा सतत प्रयत्न करताना दिसते. नाटकाच्या बांधणीचे कितीही संकेत ठरलेले असले, तरी नाटकानं ते पाळण्याऐवजी मोडण्याचाच प्रयत्न करायला हवा. पात्रांची संख्या, त्यांचं आगमन–निर्गमन, स्थळ, इत्यादी तांत्रिक तपशिलामुळेच नाटकाला, नाटकाचा आकार येत असला, तरीही, कधीकधी, यातल्या कशाचीच पत्रास न ठेवता, सगळे बांध फोडून नाटकाचा ओघ वाहू लागतो. हे उत्स्फूर्तपणे घडतं, तेव्हा ती निर्मिती निर्मात्याला आणि रसिकाला, दोघांनाही आनंद-दायक ठरते.

या विचारांच्या नादातच मी 'प्रेमकहाणी' हे मुक्त नाटक लिहिलं (१९७२). त्यानंतर ७–८ वर्षांनी पुन्हा एकदा त्याच मूडमधे मी 'तुमचे अमुचे गाणे' लिहिलं 'प्रेमकहाणी' प्रमाणेच, हेही नाटक, संपूर्ण लिहिलं जाण्याआधीच त्याचा पहिला अंक एकांकिका म्हणून ठिकठिकाणी यशस्वीपणे सादर केला गेला. 'प्रेमकहाणी' प्रमाणेच याही नाटकात मी प्रसंगांचा ओघ सरळ वाहता ठेवला, आणि त्यावर स्थळ, पात्रसंख्या इत्यादींचे कुठलेच निर्बंध घातले नाहीत, की त्यांची प्रवेशवार कृत्रिम परिणामकारक रचना केली नाही. संवाद काय असावेत, हे त्या त्या पात्रांवर सोपवलं. त्यामुळे कधी लांबलचक, तर कधी त्रोटक असं, नाट्यसंकेतांना सोडून, पण रोजच्या व्यवहारात बोललं जातं, तसंच ती पात्रं बोलली. 'प्रेमकहाणी' प्रमाणेच 'तुमचे अमुचे गाणे' मधली पात्रंही वैशिष्ट्यपूर्ण नसून सर्वसामान्य आहेत, कारण पात्रांचं वैशिष्ट्य दाखविण्यासाठीदेखील मुद्दाम ठरवून काही एक रचना करावी लागते, तशी ती, इथं करायची नव्हती. या नाटकात म्हटली तर सामाजिक समस्या आहे, परंतु तिचं दर्शन विविध अंगांनी घडवावं, अशी काहीही पूर्वयोजना केलेली नाही. या साऱ्यामागचा हेतू एवढाच, की जीवनातल्या बहुरंगीपणाचं दर्शन त्यातल्या नाट्याला मुक्तपणे वाहू देऊन, नाटककार म्हणून कुठलाही हस्तक्षेप न करता घडवावं; त्यातून तयार होईल, ते नाटक !

आता आपल्याकडे एक पद्धत आहे, ती अशी, की नाट्यमाध्यमाच्या संदर्भात

काही मूलभूत शोध घेण्याचा प्रयत्न केला, हे महत्त्वाचं मानण्यापेक्षा कथानक, त्यातल वेगळेपणा, तोही कधीकधी चमत्कृतीच्या पातळीवर जाणारा, आणि संवादांतला चमकदारपणा, यांनाच महत्त्वपूर्ण आणि कष्टसाध्य समजायचं. अशी अपेक्षा ठेवल्यास 'तुमचे अमुचे गाणे' मधला कथानकाचा, व्यक्तिरेखांचा, आणि संवादांचा पराकाष्ठेचा साधेपणा निराशाजनक वाटेल. अभिप्राय मी रसिकांवर सोपवतो. परंतु माझ्या बाजूनं एवढंच सांगता येईल, की सराईतपणा बाजूला सारून हा साधेपणा लिखाणात आणणं मला कठीण वाटतं. म्हणूनच, 'प्रेमकहाणी' आणि 'तुमचे अमुचे गाणे' ही दोन नाटकं मी वर्षानुवर्ष लिहीत होतो.

हे नाटक विनोदी असावं किंवा कारुण्यपूर्ण, अशी कुठलीच संकल्पना ठेवलेली नव्हती. तरीही त्यात एक प्रसन्नपणा यावा, असं वाटत होतं. या प्रसन्नपणाला साहाय्य केलं त्यातल्या गाण्यांनी. आधीपासून गाण्यांच्या जागा अथवा शब्दरचना ठरवून न ठेवता, जिथं भावना किंवा विचार अधिक उत्कट आणि ठाशीव करावासा वाटला, तिथं ही गाणी सहजपणे आली. कशी कोण जाणे, पण नावापासूनच या नाटकाची नाळ संगीताशी जोडली गेली.

इथं 'म्युझिकल' या प्रकाराविषयी दोन शब्द !

(हा संगीतनाट्यप्रकार मूळचा पाश्चात्त्य असल्यामुळे त्याला आपल्याकडे योग्य आणि आटोपशीर असा प्रतिशब्द नाही. म्हणून 'म्युझिकल' हाच शब्द वापरतो.)

मराठी रंगभूमीवरची नाटकांची परंपरा आता निश्चितपणे तुटलेली आहे. (नाट्यसंगीताचं पूर्वसंचित मात्र अजूनही स्वतंत्रपणे गायिलं जातं.) काळाप्रमाणे नाटकाचा एकंदर बाज बदलल्यामुळं तसं होणं अपरिहार्य होतं. बदललेले विषय, आणि जीवनाची वाढलेली गती यांना जुन्या संगीत नाटकापेक्षा 'म्युझिकल' अधिक जवळचं वाटलं. तरीही 'म्युझिकल्स' मधलं संगीत अजून लोकप्रिय होत नाही, याला कारणं अनेक पारंपरिक नाट्यसंगीताचं शास्त्रीय संगीताशी जवळचं नातं असल्यामुळे थोर गायकांच्या मैफली आणि जाहीर अथवा खाजगी बैठकी यांमधे ते पुन्हा पुन्हा गायिलं जाई. त्या काळात चित्रपट-संगीत किंवा 'लाइट म्युझिक' हीदेखील स्पर्धेला नसल्यामुळं मराठी गाणं म्हणजे नाटकांतली पदंच होती ! तस्मात् ती सातत्यानं कानांवर पडायची. आज 'म्युझिकल' मधली गाणी प्रत्यक्ष प्रयोगाखेरीज इतर कुठंच ऐकायला मिळत नाहीत, मग ती रसिकाच्या तोंडी कशी खेळणार ?

पूर्वी संगीत नाटक पाहताना, नाट्यानंदाशिवाय, उत्तम गायकाची गायकी ऐकण्याचा आणखी एक वेगळा आनंद मिळायचा. एका परीनं या संगीताला स्वतःचं वेगळं अस्तित्व असायचं. बऱ्याच नाटकांमधून पदं संपूर्ण काढून टाकणं शक्य असूनही तसं करण्याऐवजी, उलट, गद्य नाटकांमध्ये प्रमुख गायक नटाच्या सोयीसाठी नंतर पदं घालण्यात येत. याउलट गोष्ट म्युझिकल्सची. तिथली गाणी स्वतंत्र नसतात.

कथानक हे संवादांइतकंच गाण्यांमधून पुढं जातं, कधी कधी पात्रांचं मनोगत व्यक्त करतं. कोरस देखील येतो, तो, प्रसंगांना अथवा व्यक्तींच्या भावभावनांना व्यापक स्वरूप देण्यासाठीच ! यामुळं, या गाण्यांचं स्वरूप संवादांच्या जवळचं आणि सांकेतिक काव्याला व गीताला लांबचं असतं. मात्र, मुक्तपणे लिहिलेल्या या गाण्यांमधल्या ओळी तालासुरात म्हटल्यावर अधिक परिणामकारक, जोरकस आणि जिवंत होतात. काव्याची परिभाषा टाळून साधे, बोलीभाषेतले, गद्य शब्द वापरल्यामुळं हे गाणं तुमच्याआमच्या-जवळ येतं, म्हणूनच त्याला स्वतंत्र अस्तित्व न राहता तो नाटकाचा अविभाज्य भाग बनतो. उदाहरणार्थ, याच नाटकामधे पारंपरिक पदाच्या शैलीत ' हे सारे मजला मुळि ना साहवे ' असं म्हणण्याऐवजी नायक रोखठोकपणे ' साला, वैताग येतो भयंकर—या सगळ्या सगळ्याचा ! ' असं गाण्यातून जाहीर करतो, ते त्याच्या व्यक्तिरेखेशी सुसंगत, नाट्यदृष्ट्या परिणामकारक आणि अधिक अस्सल वाटतं. अर्थात ही ओळ गद्य असली, तरी तिलाही लय आहेच !

अशी मुक्त गाणी नाटकाच्या ओघात उत्स्फूर्तपणे यावीत, यासाठी त्यातील वातावरणात प्रसन्नपणा हवा. काव्यमयता हवी, आणि रोजच्याच गोष्टींना एक व्यापक परिमाण मिळायला हवं ! परीकथेतली तरलता, आणि सत्यही, कल्पनाविलास वाटेल इतक्या शानदार रीतीनं सांगण्याचा पवित्रा म्युझिकलमधे हवा. गंभीर वैचारिक नाटकाचं म्युझिकल करणं अशक्य नाही, परंतु ते विसंगत वाटेल. शॉच्या ' पिग्मॅलियन 'चं ' माय फेअर लेडी ' झालं, तशी त्याच्याच इतर नाटकांची म्युझिकल्स का झाली नाहीत ? ( आपल्याकडेही, पूर्वीच्या नाटकांमधे पाहायचं, तर ' सौभद्र 'ला संगीत जितकं शोभतं, तेवढं ते ' एकच प्याला ' ला शोभत नाही )

म्युझिकल्सच्या सादरीकरणात अनेक व्यवहारी अडचणी आहेत. पहिली मोठी अडचण ही, की कुठल्याही नाटकातल्या गाण्यांचे शब्द साथीत दगावतात. पारंपरिक नाट्यसंगीतातही ते कळत नाहीत. इथं तर वाद्यवृन्द अधिक मोठा, आणि शब्द संवादांइतकेचं महत्त्वाचे ! त्यांतून पारंपरिक पदं ऑर्गन आणि ध्वनिक्षेपक यांच्यासमोर उभं राहून म्हटल्यामुळं अधिक श्रुतिसुलभ; म्युझिकल्समधली पात्रं स्टेजभर नाचणार, फिरणार आणि गाणार त्यामुळं ध्वनिक्षेपण अशक्य नसलं, तरी जिकिरीचं ! त्यातून आपल्याकडच्या बहुतांश नाट्यगृहांचं ध्वनिक्षेपण सदोष ! म्युझिकल्ससाठी उत्तम गाणारे, आणि गाताना उत्तम अभिनयदेखील करणारे अभिनेते अभिनेत्री मिळणं फार कठीण ! जे कोणी मूठभर असतील, त्यांना आजकाल तालमीसाठी जेवढा वेळ देता येतो, तेवढ्यामधे गाणी आणि नृत्यसदृश हालचाली यांना सफाई येणं कठीण ! त्यांतून असा तयार केलेला नट कुठल्याही कारणानं बदलायची पाळी आली, तर त्याची जागा अल्पकाळात भरणं मुश्किल !

या सर्व अडचणींवर मात केल्यानंतर गाठ असते प्रेक्षकांशी—म्युझिकल्सची फारशी

सवय नसलेल्या! सूरप्रधान पारंपरिक नाट्यसंगीतावर वाढलेल्या प्रेक्षकांचं, शब्दप्रधान गाण्यांनी समाधान होत नाही. त्यातूनही धडाकेबाज संगीत किंवा विनोदी गाणं त्याला खिळवू शकतं. पण गंभीर गाण्यानं तो अस्वस्थ होतो.

सामान्य प्रेक्षकाप्रमाणेच, विद्वान समीक्षकांनीदेखील 'म्युझिकल' कडे आजवर दुर्लक्षच केलं. नाट्य-समीक्षा लिहिताना, 'लेकुरे उदंड झाली' नं नवीन संगीत आणलं, एवढा शेरा मारला, की त्यांच्या दृष्टीनं म्युझिकल्सचा इतिहास संपतो. 'घाशीराम' गाजलं, ते केवळ म्युझिकल म्हणून नव्हे. 'महानिर्वाण', 'विकट वाट वहिवाट', 'पडघम' यांच्याही संगीताकडे दुर्लक्ष झालं. 'तीन पैशांचा तमाशा' कडे थोडंफार लक्ष दिलं गेलं, पण 'देवाजीनं करुणा केली', 'अजब न्याय वर्तुळाचा', 'सप्तपुतळिका', 'अफलातून' यांच्या संगीताची नोंद नाही. माझ्या स्वतःच्याच 'चुटकीचं नाटक' (सं. दि. यशवंत देव), 'चि. सौ. कां. चंपा गोवेकर' (सं. दि. भास्कर चंदावरकर), 'विठो रखुमाय' (सं. दि. पुरु बेर्डे, यशवंत देव) आणि 'तुमचे अमुचे गाणे' (सं. दि. आनंद मोडक) या चारही म्युझिकल्सना, नामवंत दिग्दर्शकांनी उत्तम संगीत दिलेलं असूनही त्याची नोंद करण्याचा त्रास कुणी घेईलसं वाटत नाही! इतक्या (आणि नामोल्लेख न केलेल्या इतर) म्युझिकल्सच्या, प्रयोगांनंतरही आपले अभ्यासू समीक्षक फक्त 'लेकुरे, विषयी बोलतात-लिहितात, हीच परिस्थिती म्युझिकल्सच्या निर्मात्यांना हताश करणारी आहे!

एवढं असूनही, 'तुमचे अमुचे गाणे' माझ्या डोळ्यांसमोर अपरिहार्यपणे उभं राहिलं, ते एक म्युझिकल म्हणूनच! सगळे धोके पत्करून रंगतरंग थिएटर्सनं ते व्यावसायिक रंगभूमीवर आणलं. दिलीप कोल्हटकर आणि आनंद मोडक यांनी संहितेतली सारी तरलता प्रयोगात आणली, आणि सगळ्याच नव्या-जुन्या कलावंतांनी, विशेषतः चंद्रकांत काळे आणि अनुराधा रेगे, या प्रमुखांनी, त्यांत जीव तोडून कामं केली. या सर्वांनी मिळून सादर केलेल्या सुरेख प्रयोगाबद्दल मी त्यांचे साभिनंदन आभार मानतो.

— रत्नाकर मतकरी

IRBK-0123772

IRBK-0123772

क्र. ६२३४०२ ता. २८/४/९०